रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक २८९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## दोघे नायजेरियन अटकेत

**नवी मुंबई :** खारघर भागात अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन नायजेरियन नागरिकांना खारघर पोलिसांनी सापळा लावून अटक केली. सन्डे इजेको ओझोगू (४५) व पिटर मुनाचिमसो नॉफो (३५) अशी अटक केलेल्या दोघांची नावे असून, त्यांच्याकडून तब्बल ११ लाख ४० हजार रुपये किमतीचे ११४ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन तसेच त्यांची दुचाकी जप्त करण्यात आली. खारघर सेक्टर २० परिसरात जलवायू विहारच्या पाठीमागे दोघे अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २६ मार्च २०२४

किंमत ४ ₹


## चौदा हजार बॅनर्स हटविले

**अलिबाग :** जिल्ह्यातील प्रमुख चौक मोठमोठ्या बॅनरमुळे विद्रूप झाले होते. आचारसंहिता सुरू झाल्याने तब्बल १४ हजार बॅनर हटवण्याची कारवाई करण्यात आली. त्यामुळे आता ते स्वच्छ-सुंदर झाले आहेत. जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत शासकीय जागेतील, सार्वजनिक तसेच खासगी जागेवरील जाहिरातीचे फलक, भिंतीवरील लेखन, पोस्टर्स, फलक, ध्वज, बॅनर यांचा या कारवाईत समावेश आहे. एकूण १४ हजार ५५९ ठिकाणचे असे प्रकार हटवण्यात आल्याची माहिती आचार संहिता पथकाने दिली.


उन्हाळ्याची सुट्टी
AI शी गट्टी
चला करूया MS-CIT!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.


**आजचा अग्रलेख**

**केला तुका, झाला माका**

# ‘जात’ फॅक्टरचा प्रभाव

- सरकारला धक्का देण्याची तयारी
- मराठा, एसी, एसटी, मुस्लीम मते निर्णायक ठरणार



लोकसभा घमासान

आविष्कार देसाई

**। रायगड ।**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. निवडणुकीत विविध राजकीय पक्षांचे उमेदवार निवडणूक लढवत असले, तरी जातीचा फॅक्टर हा अतिशय महत्त्वाचा ठरतो. रायगड जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने ओबीसी मतदारांचे प्राबल्य आहे. त्यानंतर मराठा, एसटी, मुस्लीम, एससी आणि अन्य जाती-धर्मातील मतदारांचा समावेश होतो. मात्र, या सर्व जात घटकातील बहुतांश मतदार हे केंद्र सरकारच्या आजवरच्या धोरणांवर नाराज असल्याचे चित्र आहे. ओबीसी-मराठा समाजात सरकारने आरक्षणावरुन भांडणे लावल्याने हे सर्व जाती-धर्माचे मतदार कोणाच्या पाठीशी उभे राहणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

देशात २०१४ आणि २०१९ साली झालेली लोकसभेची निवडणूकही खऱ्या अर्थाने जाती-धर्माच्या नावावरच भाजपाने लढली होती. असे असताना रायगड लोकसभेत मात्र मोदींच्या लाटेचा असर काही दिसून आलेला नाही. रायगडातील मतदारांनी अशा लाटांना कधीच खतपाणी घातले नाही, हा इतिहास आहे. ओबीसी, मराठा समाजाचे प्राबल्य असलेल्या या मतदारसंघामध्ये काँग्रेसचे बॅ. ए.आर. अंतुले या मुस्लिम समाजातील व्यक्तीला निवडून दिले आहे. अंतुले यांनी १९८९, १९९१, १९९६ आणि २००४ या कालावधीत झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत विजय मिळवला आहे.

१९५२-२०१९ सालापर्यंत सर्व जाती-धर्मातील उमेदवारांनी लोकसभा निवडणुकीत नशीब अजमावले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अधिकांशपणे ओबीसी समाजातील उमेदवार विजयी झालेला आहे. सर्वच समाजाची मते ही दोन्ही प्रमुख उमेदवारांना मिळत आली आहेत. देशामध्ये सध्या जाती-धर्मामध्ये तेढ निर्माण करुन मतांचे विभाजन करण्याचा डाव आखला जात आहे. हे काही आता लपून राहिलेले नाही. रायगडातील मतदारांनी असल्या प्रकारांना कधीच थारा दिलेला नाही.

रायगड लोकसभेत ओबीसी आणि मराठा समाजाची ताकद फार मोठी आहे. परंतु, पान २ वर

**असे असेल जातीचे समीकरण**

- ओबीसी ५२ टक्के मतांचा वाटा (१२,०४,५८७)
- मराठा २० टक्के (४,६३,३०३)
- एसी ५ टक्के (१,१५,८२५)
- एसटी १२ टक्के (२,७७,९८१)
- मुस्लीम १० टक्के (२,३१,६५१)
- इतर (ब्राम्हण, जैन, गुजराती, शीख, पारसी) १ टक्का (२३,१६५)

**केंद्र सरकारविरोधात संताप**

एसटी, मुस्लीम, एससी आणि अन्य जाती-धर्मातील मतदारांची भूमिकादेखील या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. सध्या केंद्र सरकाने पारीत केलेल्या विविध कायद्यांमुळे या समाजामध्ये तिरस्काराची धारणा आहे. मध्यंतरी शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे कोकण दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी कडवट हिंदुत्वाला दूर सारत राष्ट्रीयत्व हेच हिंदुत्व असे अधोरेखित केले होते. त्यामुळे येथील सभांना मुस्लिम समाजातील नागरिकांनी गर्दी केली होती. त्यामुळे भाजपाला या समाजाची नाराजी निश्चित परवडणारी नाही, असे सध्या तरी दिसून येते.

## दिव्यांगांच्या आकडेवारीत सावळागोंधळ

प्रमोद जाधव

**। अलिबाग ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आठ हजार मतदार असल्याचा दावा निवडणूक विभागाने केला आहे. मात्र, या आकडेवारीत सावळागोंधळ असल्याचे दिव्यांग संघटनेकडून बोलले जात आहे. प्रत्यक्षात १७ हजारांहून अधिक मतदार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे हा प्रश्न मार्गी लावण्यात यशस्वी होतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

जिल्ह्यात लोकसभा निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन कामाला लागले आहे. मतदान केंद्रांपासून, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, ८५ वर्षांवरील मतदार आदी अनेक मतदारांची माहिती घेऊन त्यांना मतदानकरण्यासकोणत्याहीअडचणी येऊ नये यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. तालुका व विधासभा स्तरावर मतदारांची माहिती घेण्याचे कामही युद्धपातळीवर सुरु आहे. पान २ वर

> दिव्यांग मतदार चिन्हांकीत झाले नाहीत. आठ हजारांच्या आकडेवारीत तफावत आहे. ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.
> – साईनाथ पवार, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना

> रायगड लोकसभा मतदारसंघात असलेली दिव्यांग मतदार यादी जिल्हा रुग्णालयाकडून प्राप्त झाली आहे. ही आकडेवारी कमी जास्त असल्याची माहिती घेण्याचे काम तालुका स्तरावर सुरु आहे.
> – स्नेहा उबाळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी

**वेधक**

## रायगडात रंगणार तिरंगी सामना?

**मुंबई :** रायगड लोकसभा मतदारसंघाबाबत महायुतीत उमेदवारीवरुन तिढा कायम असून, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजपाने येथे दावेदारी केली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात हा वाद मिटला नाही तर इथे तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. रायगडावर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे विद्यमान खासदार आहेत. मात्र, वर्षभरापूर्वी पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांना रायगडमधून लोकसभेवर उमेदवार देण्याचा शब्द भाजप श्रेष्ठींनी दिल्याचे सांगितले जाते. मात्र, अजित पवार सत्तेत सहभागी झाल्याने सर्वच गणित बिघडली आहेत. दरम्यान, शिंदे गटाकडूनही तटकरेंच्या उमेदवारीला विरोध करीत या रायगड मतदारसंघावर दावेदारी करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात निर्णय महायुतीतच जागेचा तिढा सुटला नाही तर तिरंगी लढती होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## हॉटेल आचाऱ्यावर जीवघेणा हल्ला

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

महाड येथील एका हॉटेलमधील आचाऱ्यावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला झाल्याची घडना घडली. याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलिसांनी दोघांना अटक केले आहे. शुभम उर्फ राज अनंत तांबे आणि अमृत अनंत तांबे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील भावे येथील सुमय्या गार्डन बार अँड रेस्टॉरंट या ठिकाणी रविवार, २४ मार्च रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास हॉटेलमध्ये आलेल्या दोन तरुणांनी एकमेकांशी वादावादी करून गडबड गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्यावेळी हॉटेलचे आचारी बाळकृष्ण रामचंद्र साळुंखे (४०), रा. तळीये-महाड हे रोखण्यासाठी गेले असता दोन्ही तरुणांनी साळुंखे यांच्यावरच जीवघेणा हल्ला केला. दोन्ही तरुणांनी साळुंखेंवर धारदार शस्त्राने वार करून पान २ वर

## चोंढीजवळ भीषण अपघात

**अलिबाग :** अलिबाग-मांडवा मार्गावरील चोंढीजवळ दुचाकी आणि चारचाकीमध्ये अपघात झाला. या अपघातामध्ये दुचाकी चालक जखमी झाला असून, त्याला अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. ही घटना सोमवारी सायंकाळी साईन हॉटेलजवळ घडली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, व्हॅगनर कार घेऊन चालक मांडव्यावरून अलिबागकडे जात होता. सायंकाळी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास साईन हॉटेलजवळ आल्यावर समोरून दुचाकी आली. या दोन्ही वाहनांची एकमेकांना धडक लागली. या धडकेत दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून, दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. दुचाकी चालक अलिबागहून चोंढीकडे जात असताना हा अपघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

# जिल्ह्यात रंगोत्सवाला उधाण



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

होळी दहनानंतर रायगड जिल्ह्यामध्ये सोमवारी (दि.२५) मार्च रोजी धुळीवंदनानिमित्त रंगांची उधळण करण्यात आली. शहरी भागासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. आबालवृद्धांपासून सर्वांनीच या उत्सवाचा आनंद मनमुरादपणे लुटला.

रायगड जिल्ह्यामध्ये २४ मार्च रोजी होलिकोत्सव साजरा करण्यात आला. पूरणपोळीचा नैवेद्य दाखवित होळीची मनोभावे पूजा करण्यात आली. त्यानंतर रात्री होळीचे दहन करीत बोंब मारण्यात आली. दुसऱ्या दिवशी सोमवारी धुळीवंदननिमित्त अनेकांनी रंगाची उधळण केली. पान २ वर

## औक्षवंत व्हा...



● शेकापचे जिल्हा चिटणीस, राज्य कबड्डी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांचा वाढदिवस रविवारी उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त त्यांचे औक्षण करताना चित्रा पाटील.

## अखेर प्राण्यांच्या पाण्याची चिंता मिटली



रायगडमधील जंगल भागातील पाणवठे झाले स्वच्छ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पाणीटंचाईत केवळ माणसेच होरपळतात असे नव्हे, तर पक्षी-प्राण्यांनाही त्याचा फटका बसतो. पाण्याच्या शोधात जंगली प्राणी मानवी वस्तीत येतात आणि कोणाची तरी शिकार बनतात. त्यामुळे प्राण्यांना जंगलातच मुबलक पाणी मिळावे यासाठी वन विभागामार्फत पुढाकार घेत जंगलातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत शोधण्यात आले. हे स्रोत स्वच्छ करून जंगली प्राण्यांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिल्याने पाण्याची पान २ वर

> जंगली प्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जंगलातील पिण्याचे पाण्याचे स्रोत शोधून ते स्वच्छ करण्यात आले असून, यातून प्राण्यांना पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी कर्मचाऱ्यांसह स्थानिकांनीदेखील चांगले सहकार्य केले आहे.
> – राहुल पाटील, उपवनसंरक्षक, अलिबाग

## कर्मचाऱ्यांचा जीव टांगणीला



> महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना काम करताना स्वतःच्या सुरक्षेकडे लक्ष देण्याचे आवाहन वारंवार केले जाते. यासाठी प्रशिक्षणही दिले जाते. तसेच सुरक्षेचे साहित्यही वितरीत केले जातात.
> – ममता पांडे, जनसंपर्क अधिकारी, रायगड, महावितरण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

विजेच्या खांबावर काम करीत असताना शॉक लागून एका वायरमनचा हकनाक बळी गेल्याची घटना ताजी असतानाच, बंद झालेली विद्युत सेवा सुरळीत करताना सुरक्षेच्या साहित्याविनाच कर्मचारी काम करीत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांची सुरक्षा अक्षरशः टांगणीला असल्याचे उघड झाले आहे. मात्र, सर्व कर्मचाऱ्यांना आवश्यक ती सुरक्षाविषयक साधने पुरविली जात असल्याचा दावा महावितरणकडून केला जात आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र विद्युत कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा साधनांशिवाय वीजपुरवठ्याविषयीची कामे करावी लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातदेखील खेड्यापाड्यात मोठ्या प्रमाणात महावितरणचे जाळे पसरले आहे. ग्राहकांना चांगली सेवा मिळावी यासाठी महावितरण कंपनीमार्फत कायम व कंत्राटी स्वरुपात कर्मचाऱ्यांची नेमणूक पान २ वर

## काशीद समुद्रकिनारी दोन कार जळून खाक



**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील काशिद समुद्रकिनारी शनिवारी पर्यटनासाठी आलेल्या व पार्किंग करून ठेवलेल्या दोन गाड्या अचानक लागलेल्या आगीत जळून खाक झाल्या. याबाबत मुरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ठाणे येथून दि.२३ मार्च रोजी पर्यटनासाठी काशिद समुद्रकिनारी रस्त्यालगत पार्किंग करून ठेवलेल्या मर्सिडीज सीएलसी ३५० मॉडेलची कार नं- एमएच १४ सीसी ७६८१ व तिच्या बाजूला पार्किंग केलेली लाल रंगाची टोयोटो कार नं. एमएच १४ डीटी ५२४४ असे अचानक लागलेल्या आगीत जळून नुकसान झाले.

याबाबत मुरुड पोलीस ठाण्यात अकस्मात अग्नी क्र.१/२०२४ दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एल.डी.गोंधळी हे करीत आहेत.

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पूर्ण केला

# ५५०० कोटींचा व्यवसाय टप्पा

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

राज्याच्या सहकार क्षेत्रात अग्रणी असणाऱ्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नुकताच ५५०० कोटींचा व्यवसाय टप्पा पूर्ण केला आहे. सहकार क्षेत्रातील रोल मॉडेल बँक म्हणून बँकेने आपले निर्विवाद वर्चस्व कायम राखले आहे. सातत्यपूर्ण कामगिरी, सहकारातील प्रभावी धोरण आणि तंत्रज्ञानस्नेही म्हणून बँकेने वेळोवेळी केलेल्या बदलामुळे बँकेला हे यश संपादित करता आले आहे.



रायगड जिल्ह्यातील ग्राहकांनी बँकेवरती दाखविलेला विश्वास आणि बँकेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील आणि संचालक मंडळ यांच्या दूरदृष्टीकोनातून हा प्रगतीचा आलेख उंचावण्यास मदत होत आहे. याबद्दल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी आभार व्यक्त केले. तसेच, बँकेने या आर्थिक वर्षात सीकेवायसीचे काम पूर्ण केलेले आहे. त्यामुळे देशभरातील कोणत्याही बँकेत व्यवहार करण्यास रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ग्राहकाला एकच क्रमांक उपलब्ध होणार असून, त्याचाही लवकरच प्रचार आणि प्रसार ग्राहकांपर्यंत केला जाणार आहे, अशी माहिती वर्तक यांनी दिली.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील शेती आणि शेती आधारित पूरक व्यवसाय तसेच त्याच्यासमवेत इतरही व्यवसाय आणि उद्योजकांना कर्जपुरवठा करीत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक ग्राहकांचे बँकेशी तत्परतेचे नाते तयार झाले आहे. गृहनिर्माण सहकारी संस्था, पगारदार सहकारी संस्था, जिल्ह्यातील सहकारी पतपेढ्या, अर्बन को-ऑप. बँका या जिल्हा सहकारी बँकेशी जोडल्यामुळे सहकारातून सहकाराची वृद्धी हे आजवर बँकेचे चेअरमन आ. जयंत पाटील यांनी जपलेले धोरण आम्ही यशस्वीरित्या पुढे नेत आहोत आणि त्यामध्ये बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी बँकेच्या ग्राहकांशी आपुलकीचे नाते जपत आहेत. बँकेचे ठेवीदार, सभासद, कर्जदार आणि हितचिंतक यांचे मंदार वर्तक यांनी आभार व्यक्त केले.

**नाबार्डकडून कौतुक**

राज्यातील सहकार क्षेत्र तसेच नाबार्डने बँकेच्या या कामगिरीचे कौतुक केले असून, विविध कार्यकारी सेवा, सहकारी संस्थांचे संगणकीकरण त्यांच्यासमवेत सांपत्तिक स्थितीमधील भरीव कामगिरी आणि प्रभावी व्यवस्थापन याबद्दल बँकेचे अभिनंदन केले आहे. रायगड जिल्ह्यातील ग्राहकांनी बँकेवरती दाखविलेला विश्वास आणि बँकेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील आणि संचालक मंडळ यांच्या दूरदृष्टीकोनातून हा प्रगतीचा आलेख उंचावण्यास मदत होत असल्याचे मंदार वर्तक यांनी सांगितले.

## टेम्पो दरीत कोसळला; चौघे गंभीर जखमी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

सोमवारी दुपारी आंबेनळी घाटामध्ये टेस्ट ड्राईव्हसाठी निघालेला मिनी टेम्पो दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास दरीमध्ये कोसळला. या भीषण अपघातामध्ये चार जण जखमी झाल्याची माहिती महाबळेश्वर पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाली आहे.



पुणे येथील टाटा मोटर्सचे तीन योद्धा टेम्पो हे घाटातील टेस्ट ड्राईव्हसाठी पुणे ते पोलादपूर प्रवासाला निघाले होते. कात्रज खंडाळा येथील खंबाटकी तर वाई येथील पसरणी घाटात टेस्ट ड्राईव्ह पार करून हे तीन टेम्पो महाबळेश्वरमार्गे आंबेनळी घाटातून पोलादपूरला जात होते. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास तीनपैकी एका टेम्पोचा चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने टेम्पो सुरक्षा कठडा तोडून तीनशे फूट खोल दरीत कोसळला. यावेळी अन्य दोन टेम्पोमधील लोकांनी अपघाताची खबर पान २ वर

# श्रमिकांच्या हाती अद्याप हातरिक्षाच

## ई-रिक्षाबाबतचा अहवाल सनियंत्रण समितीकडेच; सर्वोच्च न्यायालयातील १५ एप्रिलच्या सुनावणीकडे नजरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान येथे पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांना फिरवण्यासाठी हातरिक्षा आहेत. त्या हातरिक्षा चालकांच्या हाती ई-रिक्षा देण्यात यावी म्हणून माथेरानमध्ये पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुरू करण्यात आल्या आहे. मात्र, त्याबाबत झालेल्या चर्चेचा अहवाल सनियंत्रण समितीने सर्वोच्च न्यायालयात सादर झाला नाही, त्यामुळे अद्याप श्रमिकांच्या हाती ई-रिक्षा दिली गेली नाही.**



माथेरानमध्ये चार श्रमिक एका पर्यटकाला बसवून हातरिक्षा चालवितात. ही अमानवी प्रथा बंद करण्यात यावी आणि माथेरान विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुरू करण्यात यावी, अशी मागणी २०१० मध्ये पुढे आली. सध्या पर्यावरणपूरक ई-रिक्षांचा पायलट प्रकल्प सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने राज्य सरकारकडून राबविला जात आहे. हातरिक्षा चालकांचे श्रम कमी करण्यासाठी ई-रिक्षा चालविली जावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी २०२४ मध्ये सुनावणीनंतर काढलेल्या आदेशात दिले होते. त्यानंतर त्या आदेशाबद्दल सनियंत्रण समितीला विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार अलिबाग येथे झालेल्या सनियंत्रण समितीच्या बैठकीत चर्चा झाली.

शासनाने हा अहवाल न्यायालयात सादर केला नाही, त्याबद्दल न्यायालयाने सरकारला फटकारले असून, माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू करण्याचा मूळ हेतू साध्य होत नसल्याने तात्काळ कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा केली. तर, आपल्या निर्णयात रायगड जिल्हाधिकारी यांच्यावर कडक ताशेरे ओढले आहेत. त्यांच्याकडून दोन आठवड्यात अहवाल सादर झाला नाही तर कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल, असे स्पष्ट शब्दात कळविले आहे. १५ एप्रिल रोजी माथेरान ई-रिक्षाबद्दल सुनावणी होणार आहे. त्यावेळी नव्याने १३ ई-रिक्षा खरेदी करण्याचा निर्णय असलेला अहवाल सादर होऊन न्यायालयाची परवानगी मिळते काय? याकडे माथेरानमधील ९४ हातरिक्षा चालकांचे लक्ष लागून राहिले आहे. जर १५ एप्रिलनंतर ई-रिक्षा खरेदी करून हातरिक्षा चालकांच्या हाती देण्याचा निर्णय झाला नाही, तर नंतर आणखी काही महिने हा निर्णय प्रलंबित राहणार आहे. एप्रिल महिन्यात न्यायालय उन्हाळी सुट्टीवर जात असते आणि त्यामुळे १५ एप्रिल रोजी होणाऱ्या सुनावणीत माथेरान ई-रिक्षावाढीचा निर्णय होईल, असा विश्वास श्रमिक हातरिक्षा चालक संघटनेचे पदाधिकारी शकील पटेल, प्रकाश सुतार, सुनील शिंदे यांना आहे.

### निर्णयाची अंमलबजावणी नाही

**सध्या सुरू असलेल्या सात ई-रिक्षांशिवाय आणखी १३ ई-रिक्षा खरेदी करून त्या हातरिक्षा चालकांच्या हाती देण्यावर निर्णय झाला. सनियंत्रण समितीकडून हा अहवाल महाराष्ट्र शासनाचे माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात सादर होणे अपेक्षित होते. मात्र, १३ मार्च २०२४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये नवीन १३ ई-रिक्षा खरेदी करून त्यांचे सारथ्य विभागीय परिवहन अधिकारी यांच्या कार्यालयाचे परवानाधारक हातरिक्षा चालकांच्या हाती देण्याचे ठरलेला अहवाल पोहोचला नाही.**



# आंबेत गावात सोंगाड्यांची धूम

**। आंबेत । वार्ताहर ।**

शिमगोत्सवात होळी दहन किंवा होम लागल्यानंतर कोकणात अनेक भागात सोंगाडे सोंग घेऊन गावात वेगवेगळ्या वेशभूषेत दाखल होतात. रायगडच्या आंबेतमध्येदेखील असेच काही सोंगाडे सोंग घेऊन नागरिकांना भीती दाखवत शिमग्याची गंमत लुटतात. यामध्ये स्त्रिया, लहान मुले यांचा समावेश असतो. कोकणातील शिमगा हा प्रमुख सणांपैकी एक सण समजला जातो. यामध्ये होळी दहन झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून पालख्यांचे आगमन होत असते. यामध्ये अनेक खेळी खालुबाजाच्या तालावर नाचताना दिसतात.

# हिटलरशाही हद्दपार करा

## संजोग वाघेरे पाटील यांचे आवाहन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

हिटलरशाही हद्दपार करण्यासाठी इंडिया उमेदवारांना मोठ्या मताधिक्क्याने विजय करा, तसेच मावळ लोकसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही सर्व इंडिया आघाडीचे पदाधिकारी पुढील काळात एकदिलाने काम करू, असे आश्वासन मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी दिले. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मावळ लोकसभा मतदारसंघामधील खोपोली शहरातील इंडिया आघाडी घटक पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच खोपोलीतील शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयात पार पडली, यावेळी इंडिया आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



यावेळी मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, महिला आघाडी जिल्हा संघटिका सुवर्णा जोशी, तालुकाप्रमुख एकनाथ पिंगळे, उत्तम कोळंबे, संपर्कप्रमुख उमेश गावंड, प्रवक्ते विलास चालके, उत्तम भोइर, शेकापचे संतोष जंगम, किशोर पाटील, जयंत पाठक, रवी रोकडे, कैलास गायकवाड, शांताराम पाटील, मनोज माने, संतोष पाटील, अरुण पुरी, भाई ओव्हाल, राम देशमुख, राकेश खारकर, विकी गायकवाड, दिलीप जाधव, गुरुनाथ साठीलकर, राष्ट्रवादीचे अतुल पाटील, सुवर्णा मोरे, जैबुनिसा शेख, सचिन पवार, अशोक कामते, सुधीर तेंडुलकर, संजय गायकवाड, संदेश कराळे दिनेश गुरव, विनोद रजपूत, अमित चोरगे, संदेश माने, सौदागर शिंदे, निलेश बेलोसे, छगन शेठ, विजय गोते, हमीद शेख, सनी पाटील व आपचे डॉ. शेखर जांभळे आदी प्रमुख पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी संजोग वाघेरे म्हणाले की, हिटलरशाही हद्दपार करण्यासाठी इंडिया उमेदवारांना मोठ्या मताधिक्क्याने विजय करा, तर मावळ लोकसभा मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही सर्व इंडिया आघाडीचे पदाधिकारी पुढील काळात एकदिलाने काम करू तसेच मावळ लोकसभा मतदारसंघातील गेल्या दहा वर्षात खुंटलेल्या विकासाला चालना देण्यासाठी प्रामुख्याने काम करेल व खोपोली-खालापूरमधील बंद पडलेले कारखाने सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत तरुणांच्या हातात नोकरी कशी मिळेल यावर भर देईन. तसेच खोपोली व खालापुर मधील पाणीटंचाई दूर करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम हाती घेईन.

आपापसातील मतभेद बाजूला चारून इंडिया आघाडीच्या उमेदवार संजोग वाघेरे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन शेका पक्षाचे तालुका चिटणीस किशोर पाटील यांनी केल्याचे पाहायला मिळाले असून, इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांना मोठ्या मताधिक्याने विजय करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.

# महामार्गाच्या नावाने चाकरमान्यांकडून शिमगा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या नियोजनाअभावी गेल्या अनेकवर्षांपासून कोकणात शिमगोत्सवाला जाणारे चाकरमानी प्रचंड हाल सहन करीत प्रवास करीत आहेत. वडखळ, नागोठणे ते पालीफाटा वाकणदरम्यान रस्त्याची दुरवस्था आणि पुढे इंदापूर तसेच माणगाव टाळण्यासाठी बासपास रोडचे काम पूर्ण करण्यासंदर्भात एनएचएआय आणि राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाने अक्षम्य हेळसांड केल्याने होळीसाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले. दरम्यान, पोलादपूर शहरातील अंडरपास महामार्गावरील विद्युत प्रकाश योजना ऐन शिमगोत्सवामध्ये बंद झाल्याने या रस्त्यावर अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.



- **खड्ड्यातून प्रवास करताना प्रचंड हाल**
- **इंदापूर, माणगाव बायपास रोडअभावी वाहतूक कोंडी**

गणेशोत्सव काळाप्रमाणे शिमगोत्सव काळामध्ये अवजड वाहतूक बंद न केल्याने याठिकाणी दुचाकी, तीन चाकी, चारचाकी, एसटी आणि खासगी बसेस तसेच अवजड वाहतूकही एकाचवेळी रस्त्यावर मंदगतीने कोकणाच्या दिशेने मार्गस्थ होत असल्याचे दिसून येत आहे. कोलाड सोडल्यानंतर इंदापूरला बासपास रोडचे काम गेल्या चार वर्षांपासून सुरू होऊनही पूर्णत्वास गेले नसल्याचे दिसून येत आहे. तळा तालुक्याकडे जाणाऱ्या वाहनांमुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीचा खोळंबा दिसून येत आहे तर त्यानंतर माणगांव शहरामध्ये रोड डिव्हायडर लावूनही वाहनांच्या दाटीमुळे वाहतुकीचा वेग मंदावला आहे. अशातच मोर्बारोड, काळ नदीवरील पुलाजवळ आणि लोणशी फाटा रायगडकडे जाणाऱ्या रस्त्यावरदेखील मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी दिसून आली.

पोलादपूर शहरामध्ये अंडरपास रस्त्यावरील विद्युत प्रकाशझोत बुधवारी रात्रीपासूनच बंद असल्याने अंडरपास रस्त्यावरील काळोखामधून वेगाने जाणारी वाहने शुक्रवारी रात्री आणि शनिवारी दिवसा कोठेही न थांबता पोलादपूर कधी मागे पडले, याचा विचार न करता कशेडी घाटातून थेट शिमगोत्सव काळामध्ये कोकणात जाणाऱ्या कशेडी घाटाला भुयारी मार्गाच्या पर्यायाचा वापर करीत तसेच बहुसंख्य वाहने कशेडी घाटातील कशेडी बंगला येथील टॅपसमोरूनही मार्गस्थ होत कोकणामध्ये प्रवेशकर्ती झाली आहेत. यापुढे चिपळूण बहादूरशेख नाकापर्यंतचा रस्ता काहीसा अडचणीचा ठरत असताना तेथून पुढे हातखंब्यापर्यंतचा प्रवास पुन्हा काही कि.मी. मंद वेगाने होत चाकरमानी सिंधुदूर्गपर्यंत मार्गस्थ होत आहेत.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाला पर्यायी कोकण रेल्वेचा वापर शिमगोत्सवात होत असूनही महामार्गावरील वाहतूक सुरळीत न झाल्याने प्रचंड हात सोसतही तेवढ्याच प्रचंड उत्साहामध्ये होळीचा सण आणि शिमग्याचा आनंद घेण्यासाठी कोकणी माणूस गैरसोयीबद्दल राज्यकर्त्यांना मनसोक्त 'गाळीयो' देत कोकणात रवाना झाला.



# पोलादपुरात होळीचा प्रचंड उत्साह

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर शहराचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थान आणि तालुक्यातील अनेक गावांच्या ग्रामदैवतांच्या देवस्थानांच्या शिमगोत्सवाला हजारो चाकरमान्यांची उपस्थिती लाभली आहे. शहरात वाहनांमुळे ट्रॅफिक जॅम झाल्यास चाकरमान्यांना वाहतूक उल्लंघनाच्या दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले आहे, तर गावात गेल्यानंतर ग्रामसेवकांकडून 'देताय काय घरपट्टी?' अशी मागणी होत आहे. मात्र, तरीही प्रचंड उत्साहात शिमगोत्सवाचा आनंद आबालवृध्द घेत असून, रंगपंचमीपर्यंत या सोहळ्याचे आयोजन होणार आहे. आठगांव भैरी कोंढवीतील देवस्थानाच्या पालखीचे क्षेत्र तालुक्यात सर्वात मोठे असून, पालखी गावोगाव फिरविण्यात येत आहे.

पोलादपूर तालुक्यात होलिकोत्सव काळातील सामाजिक उपक्रमांच्या आयोजनाचे प्रमाण वाढीस लागले असून, क्रिकेटच्या स्पर्धा, कबड्डीच्या स्पर्धा, सासनकाठी नाचविण्याच्या स्पर्धांचे आयोजनासह, पालखी नाचविणे, गोटे उचलणे, सासनकाठी खांद्यावर घेऊन नाचविणे आदी प्रकारांना प्राधान्य दिले जात आहेत.

पोलादपूर पोलीस ठाण्याने बिटनिहाय पोलीस बंदोबस्ताचे नियोजन केल्याने तालुक्यामध्ये कोठेही अनुचित प्रकार घडला नाही.

# अलिबाग बसस्थानकात गर्दी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

होळी सण साजरा करून चाकरमानी सोमवारी दुपारपासून परतीच्या मार्गावर निघाले. त्यामुळे दुपारपासून रात्री आठ वाजेपर्यंत स्थानकात प्रवाशांची गर्दी झाली. प्रवाशांसाठी बसेसचे नियोजन करून देताना आगारातील प्रशासनाची दमछाक उडाली.

रविवारी होळीनिमित्त मुंबई, ठाणे, पालघर, बोरीवली येथील चाकरमानी गावी आले होते. होळीच्या दिवशी रविवार आणि सोमवारी धुळीवंदननिमित्त सुट्टी होती. हा सण साजरा करून चाकरमानी परतीच्या मार्गावर निघाले होते.

प्रवाशांची संख्या स्थानकात वाढल्याने एसटी प्रशासनाने प्रवाशांसाठी पनवेलपर्यंत ज्यादा बसेसची व्यवस्था केली. अखेर आठनंतर स्थानकातील गर्दी कमी करण्यास अलिबाग आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना यश आले.



# 'तेजस्विनी'कडून धुळवड साजरी

**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाऊंडेशन रायगड यांच्यावतीने नवीन वाघविरा व हेमनगर अंगणवाडी येथे धुळीवंदन साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थितांच्या हस्ते लाभार्थींचे औक्षण केले तसेच केळी, चॉकलेट, राजगिरा लाडू, बिस्कीट यांचे वाटप करून एका अनोख्या पद्धतीने होळी साजरी केली.



यावेळी नैसर्गिक रंग मुलांच्या चेहऱ्यावर लावले गेले. यावेळी तेजस्विनी फाऊंडेशन अध्यक्षा तसेच अंगणवाडी सेविका नवीन वाघविरा ॲड. जीविता पाटील, सहसचिव राखी पाटील, कायदेशीर सल्लागार ॲड. विकास पाटील, विश्वस्त पदाधिकारी विजय पाटील, ॲड. स्वरुपा गायकवाड, अंगणवाडी सेविका धन्यता निळकर, सुगंधा पाटील, कोमल पाटील, अंगणवाडी मदतनीस सुचिता पाटील तसेच उज्वला पाटील व मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक, ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा कार्यक्रम प्रमुख निर्मला कुचिक, प्रकल्प अधिकारी गीतांजली पाटील, पर्यवेक्षिका भाग्यश्री पाटील यांनी शुभेच्छा दिल्या व या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

पान १ वरून

### 'जात' फॅक्टरचा प्रभाव

मराठा आरक्षण प्रश्नावरुन शिंदे-भाजपा-अजित पवार सरकारवर मराठा समाजाची फार नाराजी आहे. राज्यातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघात मराठा समाज पुरस्कृत एक अपक्ष उमेदवार उभा राहू शकतो. विशेष म्हणजे, हा उमेदवार मराठा, धनगर, मुस्लिम, दलित या समाजाचाही असू शकतो. ३० मार्चपर्यंत गावागावात बैठका घेऊन याबाबतचा डेटा आल्यावर प्रचाराला जायचे की नाही हे ठरवू, असे मनोज जरांगेंनी सांगितले आहे. मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या आतील आरक्षण दिले नाही. सरकार आपल्या शब्दाला जागले नाही. त्यांनी मराठा समाजाची फसवणूक केली आहे, असे मराठा क्रांती मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष विनोद साबळे यांनी 'कृषीवल'शी बोलताना सांगितले. इंडिया आघाडीने रायगड लोकसभेसाठी शिवसेना ठाकरे गटाचे माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांची उमेदवारी घोषित केली आहे. गीतेंसमोर महायुतीचा कोण प्रतिस्पर्धी असेल याबाबत स्पष्टता झालेली नाही. त्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. रायगड जिल्ह्यात तब्बल २३ लाख १६ हजार ५१५ मतदार आहेत. तसेच जातीचे समीकरण असे गृहीत धरल्यास मतदारांचा प्रत्येक जातींमध्ये किती वाटा आहे हे स्पष्ट होते.

### जिल्ह्यात रंगोत्सवाला उधाण

एकमेकांच्या अंगावर रंग उडवून हा उत्सव साजरा केला. गावांमध्ये पारंपरिक सवाद्य मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण करीत होळी रे होळी... पुरणाची पोळी... अशी आरोळी ठोकण्यात आली. विशेष म्हणजे, मोबाईलमध्ये मग्न असणारी बच्चेकंपनी व तरुणाई यावेळी स्वखुशीने या उत्सवात सहभागी झाल्याचे दिसून आहे. ढोलताशा, खालूबाजा तालावर यावेळी नाचगाणी करण्यात आली. दरम्यान, एकमेकांच्या अंगावर पाणी उडविण्याबरोबरच रंगांची उधळण करण्यात येत होती. यावेळी जल्लोष आणि उत्साहाचे वातावरण होते. दरम्यान, पर्यावरणपूरक रंगांना तरुणाईने अधिक पसंती दिल्याचे दिसून आले.

### अखेर प्राण्यांच्या पाण्याची चिंता मिटली

चिंता मिटली आहे. वाढत्या उन्हाच्या कडक्यामुळे जंगलातील पशु, पक्षी पाण्यासाठी वणवण करावी लागते. पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी पुढाकार घेतला. जंगलभागातील पाणवठे स्वच्छ करून पशु-पक्ष्यांसाठी पाण्याचा स्रोत खुला करण्याचे आदेश वनक्षेत्रपाल यांना देण्यात आला. जिल्ह्यात तातडीने त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली. अलिबासह सुधागड व अन्य तालुक्यांमध्ये वन कर्मचाऱ्यांनी स्थानिकांच्या मदतीने पाण्याचे स्रोत शोधले. ते स्वच्छ करून जंगलातील प्राण्यांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली. राहुल पाटील यांच्या संकल्पनेचे जिल्ह्यातून सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत असून, प्राणीप्रेमींनीदेखील या उपक्रमाला पाठिंबा देत पाण्याचे स्रोत स्वच्छ करण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील जंगलभागातील पशु, पक्ष्यांच्या पाण्याचा प्रश्न आता मिटल्याचे दिसून येत आहे.

### दिव्यांगांच्या आकडेवारीत सावळागोंधळ

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींसाठी आणि ८५ वर्षे पूर्ण झालेल्या वयोवृद्धांना मतदान प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टिने सक्षम ॲपच्या माध्यमातून अधिकच्या सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. रायगड मतदारसंघात एकूण ८ हजार ४६ दिव्यांग मतदार आहेत. यापैकी २ हजार ९३३ महिला, तर ५ हजार १३३ पुरुष मतदार आहेत, असा दावा निवडणूक विभागाने केला आहे. मात्र, या आकडेवारीत सत्यता नसल्याचे संघटनेच्या माध्यमातून सांगितले जात आहे. मागील कालावधीत १२ हजार मतदार होते. मग आता दिव्यांग मतदार संख्या कमी कशी झाली, असा सवाल संघटनेकडून उपस्थित केला जात आहे. यूआयडी प्रमाणपत्रानुसार जिल्ह्यात १८ वर्षांवरील १७ हजारांहून अधिक मतदार असल्याचा दावा दिव्यांग संघटनेने केला आहे. त्यामुळे ही आकडेवारी कमी असल्याचे त्यांच्याकडून बोलले जात आहे.

### कर्मचाऱ्यांचा जीव टांगणीला

करण्यात आली आहे. जिल्ह्यात एक हजार ९०० कर्मचारी असून, त्यामध्ये एक हजार शंभर कर्मचारी लाईनमन म्हणून काम करणारे आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यावर हे कर्मचारी रात्रीचा दिवस करून काम करतात. त्यावेळी फक्त ग्राहकांना चांगली सेवा कशी मिळेल याकडे ते लक्ष देत असतात. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी त्यांना सुरक्षेच्या साहित्यांचा पुरवठा केला असल्याचा दावा महावितरण कंपनीकडून करण्यात आला आहे. मात्र, हा दावा कितपत खरा आहे, याबाबत अनेकांना सांशकता निर्माण झाली आहे. बिघाडलेल्या तारांची दुरुस्ती कर्मचारी सुरक्षेच्या साहित्याविनाच असल्याचे अनेकवेळा दिसून येत आहे. कर्मचारी काम करीत असलेल्या घटनास्थळी अधिकारीदेखील असतात. तरीदेखील त्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलली जात का नाही, असा सवाल अनेकांकडून उपस्थित केला जात आहे. याकडे महावितरण कंपनीने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

### आंबेनळी घाटात टेम्पो दरीत कोसळला

मेटतळे गावातील लोकांना दिली असता काही तरुणांनी अपघातस्थळी धाव घेत दरीमध्ये उतरून मदतकार्य केले. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महाबळेश्वर ट्रेकर्स, सह्याद्री ट्रेकर्स आणि प्रतापगड ट्रेकर्सच्या जवानांनी बचावकार्यासाठी धाव घेतली. महाबळेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी जाऊन बचावकार्यात सहभाग घेतला. याप्रसंगी महाबळेश्वरच्या तहसीलदार तेजस्विनी खोचरे-पाटील यांनीही घटनास्थळी उपस्थित राहून बचावकार्यात सहभाग घेतला. जखमींमध्ये टेम्पो चालक देवदत्त वाघ व इंजिनियर जितेंद्र खाणे हे गंभीर जखमी असून, त्यांना पुण्यातील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दरीत उतरून बचावकार्य करणारे दोन स्थानिक युवक सीताराम शिंगरे व सोमनाथ वागदरे हेदेखील जखमी झाले आहेत. जखमींना प्रथम महाबळेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. महाबळेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयातील एकही रुग्णवाहिका घटनास्थळी न आल्याने आणि वैद्यकीय पथकही न आल्याने तहसिलदार पाटील आणि उपविभागीय अधिकारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

### हॉटेल आचाऱ्यावर जीवघेणा हल्ला

त्यांना जखमी केले. याबाबत साळुंखे यांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार शुभम उर्फ राज अनंत तांबे आणि अमृत अनंत तांबे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा अधिक तपास महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने आणि पोलीस उपनिरीक्षक विक्रांत फडतरे हे करीत आहेत.

# शालेय क्रीडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे आणि टाटा कॅपिटल आयोजित सुधागड तालुकास्तरीय शैक्षणिक व क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी ग.बा. वडेर हायस्कूल, पाली, ता. सुधागड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे व समन्वयक बळीराम निंबाळकर यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

दरम्यान, सुधागडातील शाळांना आवश्यक ती सर्व प्रकारची मदत सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे यांच्याकडून केली जाईल, शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी पुढे येणे आवश्यक आहे. सुधागडातील शाळांतून शिकणारा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आणि यूपीएससी, एमपीएससीच्या परीक्षांमध्येही चमकला पाहिजे, असा विश्वास घाडगे यांनी व्यक्त केला.

मार्च महिन्यात ॲथलेटिक्स स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धांचे पारितोषिक वितरण सुधागड पालीतील ग. बा. वडेर हायस्कूलमध्ये शनिवारी संपन्न झाले.

यावेळी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, उपाध्यक्ष वसंत लहाने, सरचिटणीस राजू पातेरे, समव्यक बळीराम निंबाळकर, उपखजिनदार विजय जाधव, प्रसिद्धीप्रमुख अजय जाधव, कार्यकारी सदस्य हरिश्चंद्र मालुसरे, ग.बा. वडेर हायस्कूलचे प्राचार्य भाऊसाहेब घोडके, पत्रकार संदेश उतेकर, नरेश शेडगे, सुजीत जगताप, पाटील, पाफाळे, वाघुले, खाडे आदी विविध शाळांचे प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली जमिनीची मिळकत तिचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. सत्यवान जोमा पाटील यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन येणेप्रमाणे -

**मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत -**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १६/५ | ०.५३.०० | ०.४८ |

येणेप्रमाणे जमिनीची मिळकत तदंगभूत सर्व हक्कहितसंबंध सुध्दा हा या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, खरेदीखत, ताबा, कुळवहिवाट, साठेकरार, मृत्यूपत्रांकित दान, लीज, चार्ज, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून योग्य ती कायदेशीर प्रकिया पूर्ण करून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी कळावे.

दिनांक : २६/०३ /२०२४
पत्ता : पाल टॉवर भिसेगाव
ता. कर्जत जि. रायगड
मो. ९३०७८८५७११.

खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. यज्ञेश अ. भागवत**
(बी.ई.एल.एल.बी.)

# रायगडात रंगांची मुक्त उधळण



● (छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सप्तरंगांची उधळण आणि मनसोक्तपणे पाण्यात भिजण्याचा आनंद धुळवडीच्या दिवशी जिल्ह्यात सर्वत्र दिसून आला. एकमेकांना रंग लावून धुळवडीच्या शुभेच्छा देत अतिशय जल्लोषात धुळवडीचा सण साजरा करण्यात आला. रायगड जिल्ह्यात बच्चे कंपनीने इको फ्रेंडली रंगांचा वापर करुन ते रंगाच्या उत्सवात चांगलेच न्हाऊन निघाल्याचे दिसून आले. होळी सणानिमित्त पर्यटकही दाखल झाले होते. त्यांनीही स्थानिकांच्या रंगात रंग मिसळून सप्तरंगांची उधळण केली.रविवारी होळी सणाच्या दिवशी वाईट विचार, आळस, निराशा, दारिद्र्य यांचे दहन करुन झाल्यानंतर सोमवारी जिल्ह्यातील विविध भागांमध्ये धूलिवंदन धूमधडाक्यात साजरे करण्यात आले. रायगड जिल्हा हा उद्योगांचा जिल्हा असल्याने येथे परप्रांतीयांची संख्या दखल घेण्याइतपत वाढलेली आहे.धूलिवंदनाचा वाढता ट्रेंडच आता रंगोत्सवाचा सण झाला असल्याने तो जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात खेळला जात आहे.

जिल्ह्यातील महत्त्वाच्या समुद्र किनारी स्थानिकांसह पर्यटकांनी तोबा गर्दी केली होती. नाक्या-नाक्यावर तरुणांचे जथ्ये एकमेकांवर रंगांची उधळण करीत होते. रंग खेळून झाल्यावर सर्वांची पावलेही समुद्रकिनारी जाताना दिसत होती. समुद्राच्या पाण्यात मुक्तपणे डुंबत त्यांनी आपल्या अंगावरचे रंग उतरवले. समुद्रकिनारी पर्यटकही मोठ्या संख्येने आले होते. त्यांनीही समुद्र स्नानाचा आनंद घेतला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जीव सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले होते.

शनिवार , रविवार आणि सोमवार अशा सलग सुट्ट्यांमुळे होळी आणि धुलीवंदनाच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भाग आणि शहरी भागासह जिल्ह्यातील समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे ही पर्यटकांनी बहरून गेली होती. अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी पहायला मिळाली. समुद्रकिनारी जलक्रीडा, घोडागाडी, उंट सफारी, एटीव्ही सफारीचा आनंद आणि तोही विविध रंगांच्या साथीने स्थानिकांसह पर्यटकांनी लुटला. सलग आलेल्या सुट्ट्या आणि धुळवड साजरी करण्यासाठी पर्यटकांनी रायगडला पहिली पसंती दिली आहे. त्यामुळे २२ मार्चपासून जिल्ह्यात लाखो पर्यटक मजा करण्यासाठी दाखल झाले होते.

मुंबई, पुणे तसेच इतर जिल्ह्यांतून पर्यटक जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर मौजमजा करताना दिसले. त्यामुळे जिल्ह्यातील अलिबाग, नागाव, आक्षी, वरसोली, रेवदंडा, काशीद, मुरुड, हरिहरेश्वर, श्रीवर्धन, दिवेआगर समुद्रकिनारे पर्यटकांनी हाउसफुल्ल झाले होते. समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांना समुद्र स्नानासह सुविधा उपलब्ध आहेत. जलक्रीडामध्ये बोटिंग, बनाना, जेट्सकी राइडचा आनंद पर्यटक लुटत होते. जलक्रीडा व्यावसायिक हे पर्यटकांना पॅकेज देऊन सुरक्षित आणि काळजी घेऊन राइड करीत होते. त्यामुळे समुद्रकिनारी व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांनाही आर्थिक लाभ झाल्याचे पहावयास मिळाले.




बेलोशी


मुरूड


मुनवली


अलिबाग रायवाडी कॉम्प्लेक्स


विद्यानगर


चिरनेर


कर्जत


खांब


महाजने


रोहा


पाली


महाजने


पनवेल


उरण


शिहू बेणसे


श्रीगाव


सोगाव


सुतारवाडी

# केला तुका, झाला माका

भाजपचे नेते सत्तेने आंधळे झालेले आणि सूडाने पेटलेले आहेत. दिल्लीत अरविंद केजरीवाल यांनी भाजपच्या सत्तेला शह दिल्यापासून आम आदमी पक्षाला कोंडीत पकडण्याचे भाजपचे प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी गेल्या दोन-तीन वर्षांपासून जाळे टाकणे चालू होते. आता भाजपने त्याच्या मते निर्णायक पाऊल टाकले. इडीला हाताशी धरून अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली. हे कारस्थान भाजपवरच उलटणार आहे. महाराष्ट्रात व इतर राज्यांतही आजवर अनेक नेत्यांना इडीने चौकशीसाठी बोलावले किंवा काहींना अटकही केली. मात्र त्या कारवाईच्या वेळी जनतेची फारशी प्रतिक्रिया उमटली नव्हती. केजरीवाल यांच्या अटकेनंतर मात्र दिल्लीतील जनता उस्फूर्तपणे रस्त्यावर आलेली दिसली. निदर्शने करण्यात आली. राजस्थान व गुजरातेतही काही प्रमाणात त्याचे पडसाद उमटले. केजरीवाल यांचे सर्वच राजकारण कोणाला मान्य होणार नाही. त्यांनी संधी मिळेल तेव्हा भाजपचाच हिंदुत्वाचा अजेंडा पातळ करून पुढे रेटण्याचा काही वेळा प्रयत्न केला. आम आदमी पक्षात आरंभापासून असलेले प्रशांत भूषण, योगेंद्र यादव हे केजरीवाल यांच्या अहंमन्य व एकाधिकारवादी स्वभावामुळे बाहेर पडले. केजरीवाल हे अत्यंत धूर्तपणे सर्व फोकस स्वतःवर राहील हे पाहत असतात. हे सर्व दोष असले तरी त्यांनी व त्यांच्या पक्षाने जनतेच्या भल्याच्या योजना राबवून दिल्ली व पंजाबात व्यापक पाठिंबा मिळवला आहे. शिवाय, या काळात त्यांनी सातत्याने भाजप व नरेंद्र मोदी यांच्यावर अतिशय भेदक टीका केली आहे. २०१९ मध्ये तर केजरीवाल यांनी मोदी यांच्याविरुध्द लोकसभेची निवडणूक लढवून चांगली मते मिळवली होती. त्यातच अलिकडे त्यांनी इंडिया आघाडीत राहण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेतली आहे. चंडीगडमध्ये महापौर निवडणूक बेकायदेशीरपणे जिंकण्याचा भाजपचा डाव फसल्यानंतर तेथे काँग्रेस व आप एकत्र आले. दिल्लीतही त्या दोघांची युती झाली. आता दोघांची संयुक्त ताकद भाजपला भारी पडणार आहे.

### नड्डांना अटक होईल?

यापूर्वी आम आदमी पक्षाच्या मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, संजय सिंग यांना अटक झाली होती. पण केजरीवाल यांची अटक ही उंटाच्या पाठीवरची शेवटची काडी ठरणार आहे. भाजपचा जो खोटा डोलारा उभा आहे तो कोसळणार आहे. केजरीवाल वा त्यापूर्वीच्या नेत्यांना अटक करताना झडत्या वगैरे कारवाया झाल्या. पण आजतागायत कोठेही बेकायदा पैसे मिळाल्याचे पुरावे इडीला समोर आणता आलेले नाहीत. उलट या प्रकरणातील तथाकथित माफीचा साक्षीदार असलेल्याने भाजपलाच निवडणूक रोख्यांमार्फत तब्बल ५५ कोटी रुपये दिल्याचे उघड झाले आहे. अरबिंदो फार्मा ही एक नामांकित औषधी आहे. तिच्या मालकांपैकी एक असलेला शरद रेड्डी याच्यावर इडीने बराच दबाव आणला असावा असे स्पष्ट दिसते. दिल्लीतील कथित दारु घोटाळ्यामध्ये केजरीवाल यांच्याशी आपला संबंध आहे अशी साक्ष द्यावी म्हणून रेड्डी याच्यावर दबाव आणण्यात आला. त्यावेळी जाहीरपणे त्याने त्याचा इन्कार केला. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. त्यासरशी त्याने जबाब बदलला आणि केजरीवाल हेच याचे सूत्रधार असल्याचे सांगितले. सर्वात कहर म्हणजे रेड्डी याच्या कंपनीने या काळात भाजपला ५५ कोटींच्या देणग्या निवडणूक रोख्यांमार्फत दिल्या. त्यानंतर रेड्डीची तुरुंगातून सुटका झाली. कळस म्हणजे पाठ दुखते आहे अशी तक्रार करताच त्याला न्यायालयाला जामीन दिला व इडीनेही त्या जामिनाला विरोध केला नाही. कोरेगाव भीमा प्रकरणातील आरोपी ८० वर्षांचे स्टेन स्वामी यांना हाताने पाणी पिता येत नसल्याने त्यांनी स्ट्रॉ मागितली तर पोलिसांनी त्याला विरोध केला होता. इथे शरद रेड्डी मात्र पाठीच्या दुखण्याच्या कारणावरून तात्काळ सुटला. आम आदमी पक्षाला पैसे मिळाले या आरोपावरून केजरीवाल यांना अटक झाली आहे, पण पैशांचे पुरावे मिळालेले नाहीत. पण त्याच प्रकरणातील रेड्डीने भाजपला ५५ कोटी रुपये दिल्याचे मात्र स्पष्ट पुरावे आहेत. त्यामुळे या प्रकरणी भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांना तात्काळ अटक व्हायला हवी.

### कमळाचा चिखल

अर्थातच तसे काही होणार नाही. कारण, इडी किंवा सीबीआय या यंत्रणा म्हणजे भाजपचे पाळीव श्वान असल्यासारख्या आहेत. भाजपचे नेते इशारा करतील त्यानुसार त्या भुंकत असतात. मात्र केजरीवाल यांच्या अटकेच्या निमित्ताने केला तुका आणि झाला माका या म्हणीचा भाजपला प्रत्यय येणार आहे. भाजप केजरीवाल आणि आम आदमी पक्षाला ज्या जाळ्यात अडकावयला गेला त्यामध्ये तो स्वतःच अडकणार आहे. भाजपला ८ हजार कोटी रुपयांचे रोखे कसे मिळाले याचा हिशेब आज ना उद्या द्यावा लागणार आहेच. येती लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपचा जिवाचा आटापिटा चालू आहे. त्यासाठी विरोधकांना व त्यातही काँग्रेसशी जुळवून घेणाऱ्या विरोधकांना संपवण्याचा कट आखला जातो आहे. मात्र असा दांडगटपणा करून मते भाजपलाच मिळतील याचा अजिबात भरवसा नाही. त्या निवडणुकीच्या काळात केजरीवाल व तत्सम विरोधकांना तुरुंगात ठेवायचे असा हा सर्व डाव आहे. विशेषतः काँग्रेसशी मैत्री करणाऱ्यांना अधिक लक्ष्य बनवले जात आहे. तमिळनाडूमध्ये द्रमुक आणि महाराष्ट्रात शिवसेना हे विशेष रडारवर आहेत. त्याचा मुकाबला विरोधकांना एकत्रितपणे करावा लागेल. त्यादृष्टीने येत्या रविवारी विरोधकांचा असा ऐक्य मेळावा होणार आहे हे चांगली बाब आहे. केजरीवाल आणि निवडणूक रोखे प्रकरणामुळे भाजपची उरली सुरली अब्रू गेली आहे. एकेकाळी आपण नैतिकतेचा व सदाचाराचा अर्क असल्याचा त्यांचा तोरा होता. मात्र भाजपचे कमळ इतर कोणाहीपेक्षा अधिक चिखलात बुडालेले आहे हे निवडणूक रोखे आणि केजरीवाल याच्या माहितीवरून ठळकपणे दिसते. आता विरोधकांनी हा मुद्दा प्रभावीपणे लोकांपुढे नेला तर भाजपची ताकद कमी होऊ शकेल. केजरीवाल दिल्लीतले असले तरी भाजप पूर्ण देशातला पक्ष आहे व या प्रकरणात त्यालाच सर्वाधिक लाभ झाला आहे हे निर्विवाद. त्यामुळे हे प्रकरण त्याच्यावर उलटवावेच लागेल.

विचार

# कोणते मुद्दे गाजवणार निवडणुकीचे मैदान?

**अखेर लोकशाहीतील सर्वात मोठ्या उत्सवाला प्रारंभ झाला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होणे, आचारसंहिता लागू होणे आणि राजकीय पक्षांनी शड्डू ठोकून या आखाड्यात उतरणे ही दर पाच वर्षांनी बघायला मिळणारी घटना असली तरी प्रत्येक वेळी त्याचे संदर्भ बदलतात. सलग दहा वर्षे एकहाती सत्ता असल्याने यंदाचे संदर्भही वेगळे आहेत. कोणत्या मुद्द्यांवर गाजणार ही निवडणूक?**

लोकसभा निवडणुकांची कार्यक्रमपत्रिका जाहीर झाली असून लोकशाहीतील सर्वात मोठ्या सोहळ्याचा आरंभ झाल्यामुळे देशातील वातावरण बदलून गेले आहे. १९ एप्रिलपासून सात टप्प्यांमध्ये सुरु होणाऱ्या निवडणुकांद्वारे पुढील पाच वर्षांमधील राजकीय चित्र स्पष्ट होईल. मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणुकांचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करत या निवडणुका पारदर्शक, सुसंकृत आणि कायदा-सुव्यवस्थेचे भान राखत पार पाडण्याची हमी दिली असून राजकीय पक्षांना यासंबंधी उत्तम आचार ठेवण्याचे संकेतही दिले आहेत. निवडणूकपूर्व सर्वेक्षणातून राजकीय विश्वातील जाणकार आणि अभ्यासकही वेगवेगळ्या मुद्द्यांना स्पर्श करताना दिसत आहेत. एकंदरच सर्वसामान्य मतदारांसाठी हा काळ राजकीय परीघाची व्यापकता जाणून, आपले प्रतिनिधित्व करणाऱ्या उमेदवाराची पत आणि कुवत लक्षात घेत त्याच्या नाव आणि चिन्हावर पसंतीची मोहर उमटवण्याचा आहे. तेव्हा राजकारण्यांबरोबरच देशातील समस्त मतदारांनीही नागरिकत्वाचे हे प्रमुख कर्तव्य बजावण्याची सिद्धता करणे गरजेचे आहे.

मतदान मंडळानुसार ४४ दिवस चालणाऱ्या या मतदान प्रक्रियेत तब्बल ९७ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यात ४९.७ कोटी पुरुष आणि ४७.१ कोटी स्त्रियांचा समावेश आहे. देशातील १०.५ लाख मतदान केंद्रांवर मतदानाची ही प्रक्रिया पार पडेल. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही सात टप्प्यांमध्ये मतदान झाले होते. तेव्हा एकूण ९१.२ कोटी पात्र मतदार होते. त्यातील सुमारे ४३.८ कोटी महिला मतदार आणि जवळपास ४७.३ कोटी पुरुष मतदार होते. मतदारांची ही वाढलेली संख्याही लक्षात घेण्याजोगी आहे.

एकीकडे पंतप्रधान म्हणून मोदींची हॅटट्रिक तर दुसरीकडे इंडिया आघाडीची एकजूट आणि काँग्रेसच्या अस्तित्वाचा प्रश्न हे यंदाच्या लोकसभा निवडणुकीसाठीचे महत्त्वाचे मुद्दे आहेत. मात्र याखेरीज अन्य काही मुद्द्यांचाही मोठा प्रभाव आणि परिणाम दिसून येणार आहे. त्यातील पहिला मुद्दा अर्थातच राम मंदिराचा आहे. जानेवारीमध्ये एका भव्य समारंभाद्वारे मोदींनी 'मंदिर वही बनाएंगे' हा संकल्प पूर्णत्वास नेला आणि निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा विषय चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. या घटनेने भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेला हवा आणि वेगळे बळ देण्याचे काम केले. ज्ञानवापीमध्ये पूजा पुन्हा सुरू करणे तसेच सांस्कृतिक 'पुनरुज्जीवना'बद्दलचा सामान्य आवाज या सर्व गोष्टींमुळेदेखील भाजपाला विश्वासू आणि

**प्रा. अशोक ढगे**

कुंपणावरील काही लोकांसाठी एक ठोस भूमिका घेणारा पक्ष अशी ओळख निर्माण करता आली. राममंदिरामुळे मोदींच्या वैयक्तिक विश्वासार्हतेतही भर पडल्याचे नाकारता येणार नाही. सहाजिकच राममंदिर हा २०२४ च्या निवडणुकीतील महत्त्वपूर्ण पैलू असणार यात शंका नाही.

मोदींनी इतरांच्या चुकांमधून धडा घेतला असल्याचे दिसून येते. वाजपेयींनी २००४ मध्ये द्रमुक आणि पासवान यांच्याकडे पाठ फिरवली आणि पुढे त्यांना त्याची किंमत चुकवावी लागली. २०२४ मध्ये मोदी बहुसंख्य नागरिकांचे आवडते नेते असूनही सर्व स्पष्ट-अस्पष्ट समस्यांची जाण राखत भाजपाने नितीशकुमार, चंद्राबाबू नायडूंना यांना जोडण्याचा धोरणीपणा दाखवला. याद्वारे दूर गेलेल्या एनडीए भागीदारांना परत आणण्याचा मार्ग अंगिकारण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. त्यांनी जेडी(एस)सारख्या पूर्वीच्या शत्रूंनाही सामावून घेतले. बीजेडीशी अजूनही चर्चा सुरू असल्याचे दिसते. उत्तर प्रदेश, दिल्ली, तमिळनाडू, बिहार आणि महाराष्ट्रात मित्रपक्षांचा, युतीचा मान राखण्याचे भाजपाचे धोरणही या निवडणुकांवर प्रभाव दाखवल्याखेरीज राहणार नाही.

देशाचे वाढते सकल राष्ट्रीय उत्पन्न हीदेखील भाजपाच्या दृष्टीने जमेची आणि निवडणुकीवर परिणाम करणारी बाब ठरेल. वाढत्या जीडीपीमुळे मतदारांचा निर्णय भाजपाच्या बाजूने झुकण्याची शक्यता अनेक अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत, कारण मतांच्या माध्यमातूनच मतदार सरकारच्या अर्थव्यवस्थेच्या हाताळणीसंदर्भातील आपला निकाल समोर ठेवत असते. खेरीज कल्याणकारी हस्तांतरणामुळे स्थानिक अनुभवांवर कसा परिणाम होतो हेदेखील या निवडणुकीच्या निकालांद्वारे बघायला मिळणार आहे. विविध कल्याणकारी योजनांचा फायदा घेऊन बरकत अनुभवणारा वर्ग यंदा मोदींच्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या पर्वाचे जोरदार स्वागत करताना दिसेल.

महागाईचा प्रश्न येतो तेव्हा मोदी पूर्वसुरींच्या तुलनेत अधिक बोलल्याचे नेहमीच दिसून आले आहे. त्यांनी किरकोळ इंधनाच्या किमती महिनोंमहिने गोठवून ठेवल्या. अलिकडेच इंधनाच्या किमती कमीही करण्यात आल्या. एलपीजीच्या किमतीत वारंवार कपात केली गेली. अन्न निर्यातीवर एकापेक्षा जास्त वेळा बंदी घातली गेली. ८० कोटी भारतीयांना मोफत अन्नधान्य दिले गेले. यावेळी सरकारने अर्थतज्ज्ञांच्या टीकेचीही पर्वा केली नाही. मोफत अन्नवाटप मोहिमेला उधाण आल्याने काही प्रकारच्या अन्नधान्यामध्ये चलनवाढ कायम राहते पण काही धक्केही कमी होतात. सहाजिकच त्यामुळे विरोधासाठी भूमिका बजावणारा मोठा राष्ट्रीय घटक प्रस्थापित सरकारच्या बाजूकडे झुकतो. थोडक्यात, मागणी आणि पुरवठ्यातील समन्वय साधत चलनवाढ टाळून महामारीच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेली तूट आणि विस्कळित झालेला वित्तपुरवठा सामान्य पातळीवर आणणे या मोदी सरकारच्या स्मार्ट गोष्टींची दखल या निवडणुकीमध्ये अवश्य घेतली जाईल. मोदी सरकारतर्फे अलिकडेच समान नागरी कायद्याविषयीचे नियम अधिसूचित केले गेले. यावरुन नेहमीचे राजकारण सुरू झाले आहे. परंतु बंगालच्या सीमावर्ती भागाबाहेर आणि आसामच्या काही भागांच्या निवडणुकांवर त्याचा कसा परिणाम होईल हे आता बघावे लागणार आहे. आसाममध्ये बंगाली भाषिक आनंदी होतील तर आसामी भाषिक नाराज होतील. इतरत्र भाजप हिंदूत्वाची भावना बळकट करण्यासाठी सीएएचा प्रभाव किती वापरतो हे पहावे लागेल. दुसरीकडे, विरोधक ध्रुवीकरणावर चर्चा करण्यासाठी त्याचा वापर करू शकतात.

या निवडणुकीवर ईडी, सीबीआय, आयकर खात्याकडून झालेल्या कारवायांचा मुद्दाही प्रभावी ठरणार आहे. यापूर्वीच्या राजकीय चर्चेमध्ये तपास यंत्रणांनी कधीच इतके लक्ष वेधून घेतले नव्हते. एकीकडे बहुतेक विरोधी नेते भ्रष्ट असल्यामुळे केंद्रिय तपास यंत्रणाच्या कक्षेत आल्याचे भाजपाचे म्हणणे आहे तर दुसरीकडे विरोधी पक्ष याला भाजपचे सूडाचे राजकारण म्हणत आहेत. भाजपशी निष्ठा बदलणारे नेते संपवले जातात, असेही काहींनी म्हटले आहे. विरोधी पक्षनेत्यांच्या छाप्यात सापडलेली सर्व रोकड आणि मौल्यवान वस्तू बघा, असे भाजपचे म्हणणे आहे. या दोषारोपांचा निवडणुकीवर प्रभाव राहणार आहे. पण दोन्ही बाजूंनी होणाऱ्या युक्तीवादांचा मोदींना अधिक फायदा होण्याची शक्यता आहे.

एकीकडे या सगळ्या मुद्द्यांची चर्चा करत असताना वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न वातावरण तापवणारा ठरु शकतो. किंबहुना, हेच विरोधी पक्षांच्या हातातील सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अगदी सरकारच्या आकडेवारीवरूनही दिसून येते की देशात बेरोजगारीची समस्या गंभीर असून अनेक भारतीय स्वयंरोजगारात किंवा घरगुती रोजगारात आहेत. स्वाभाविकच त्यांना रोजगाराची कोणतीही हमी नाही. सरकारी विभागांमधील रिक्त जागा भरण्यात आलेल्या नाहीत. सरकारी नोकऱ्यांसाठी असणारी स्पर्धा तीव्र होत आहे. परदेशात कमी/मध्यम कौशल्याच्या नोकऱ्या शोधण्याची शर्यतही वाढली आहे. कौशल्यविकास कार्यक्रमांचा कितीही बोलबाला होत असला तरी त्याची उपयुक्तता हव्या त्या प्रमाणात दिसत नाही. त्यामुळे पूर्वी कधीही नव्हता एवढा नोकऱ्या हा यंदाच्या निवडणुकांमध्ये प्रमुख घटक राहणार आहे. गेली दहा वर्षे देशाने स्थिर सरकार अनुभवले. जनता पक्ष फुटल्यानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या आणि त्यांच्या हत्येनंतर राजीव गांधींनी पंतप्रधान स्विकारले. याचा शेवट मनमोहन सिंग यांच्या 'युतीची मजबुरी' या विधानाने झाला. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली देशाला स्थिर सरकार मिळाले होते. त्यानंतर मोदींना ते साध्य झाले. त्यामुळेच ते आताच्या मजबूत भारताला स्थिर सरकारची गरज असल्याचे आणि ते देण्यास आपण समर्थ असल्याचे उच्चारवात सांगत आहेत. हे सांगताना ते बाह्य आव्हाने खूप जास्त असल्याचेही जनतेसमोर मांडताना दिसत आहेत. त्यामुळेच विरोधी पक्ष आरोप करतात त्या प्रमाणे जनता 'हुकूमशाही' स्विकारते की स्थिर सरकार देण्याचा मोदींचा दावा मान्य करते हे लवकरच समजेल.

आजकाल

# कर्नाटकात भाजपमधील बंडखोरी

कर्नाटक भाजपमधील ज्येष्ठ नेते के एस ईश्वरप्पा यांनी बंडाचा झेंडा उभारला आहे. त्यांनी शिमोगा लोकसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांची समजूत काढण्याच्या प्रयत्न भाजपने करून पाहिला. पण ईश्वरप्पा माघार घेण्याच्या मनस्थितीत नाहीत. त्यांचा सारा रोष आहे तो कर्नाटकातील वरिष्ठ नेते येडियुरप्पा यांच्यावर. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर प्रचारसभेच्या व्यासपीठावर उपस्थित राहण्यास देखील ईश्वरप्पा यांनी नकार दिला.

आपण अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असलो तरी आपण नक्की निवडून येऊ आणि निवडून आलो की दोन महिन्यांत भाजप नेतृत्व आपल्याला पक्षात प्रवेश देईल असे त्यांनी म्हटले आहे. एका अर्थाने ते माघारीचे दोर न कापलेला बंडखोर ठरतील! त्यांनी येडियुरप्पा यांना दिलेले आव्हान त्यातून जास्त ध्वनित होते कारण शिमोगा मतदारसंघात ईश्वरप्पा यांनी येडियुरप्पा यांचे चिरंजीव आणि भाजपचे अधिकृत उमेदवार बी. वाय. राघवेंद्र यांच्या विरोधात शड्डू ठोकला आहे.

कर्नाटकात जनसंघापासून ज्यांनी भारतीय जनता पक्षाचा विस्तार करण्यासाठी मेहनत घेतली त्यांत ईश्वरप्पा यांचा समावेश आहे. १० जून १९४८ रोजी जन्मलेले ईश्वरप्पा यांचे आई-वडील रोजंदारीवर मजूर होते. ईश्वरप्पा यांचीही त्यांना मदत करण्याची इच्छा असे; पण त्यांच्या आईचा आग्रह आपल्या मुलाने शिकावे असा होता. ईश्वरप्पा यांनी शिमोगामध्ये महाविद्यालयीन शिक्षण वाणिज्य शाखेतून पूर्ण केले. त्याचवेळी त्यांचा संबंध अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी आला. पदवीधर झाल्यांनतर ईश्वरप्पा यांनी काही काळ स्वतःचा व्यवसाय केला; पण लवकरच ते राजकारणात ओढले गेले. जनसंघाचे ते कार्यकर्ते झाले. आणीबाणीच्या काळात त्यांना अटक झाली होती..

भाजपचे कर्नाटकातील चेहरे म्हणून अगदी प्रारंभीच्या काळात ज्यांचा उल्लेख होई त्यांत जसे येडियुरप्पा आणि अनंत कुमार होते तद्वत ईश्वरप्पा हे देखील होते. १९८९ मध्ये ते पहिल्यांदा शिमोगा विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले आणि नंतर अपवाद वगळता ते याच मतदारसंघातून नेहेमीच निवडून येत राहिले. १९८२ मध्ये ते भाजपच्या शिमोगा शाखेचे अध्यक्ष बनले. त्यांनतर ईश्वरप्पा यांनी मागे वळून पाहिले नाही असे म्हटले तरी त्यांच्या वाटचालीला काहीशी मर्यादाही होती. ती पुरेशी महत्त्वाकांक्षा नसण्याची असेल किंवा वेळीच पुढाकार न घेण्याची असेल. पण त्यामुळे काही संधी त्यांच्या वाट्याला आल्या तशा काही निसटल्या देखील. तथापि कर्नाटकात भाजपचे स्थान बळकट करण्यात त्यांचे योगदान आहे हे नाकारता येणार नाही.

१९९३ मध्ये ईश्वरप्पा यांच्याकडे पक्षाने कर्नाटक प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सोपविली. त्यावेळी विधानसभेत भाजपचे केवळ चार आमदार होते. तेंव्हा आव्हान मोठे होते. पण ईश्वरप्पा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने १९९४ च्या निवडणुकांत मोठे यश मिळविले. त्या पक्षाच्या आमदारांची संख्या थेट दहापट वाढून ती चाळीसवर पोचली. ईश्वरप्पा भाजपचे विधिमंडळ नेते झाले. ईश्वरप्पा हे कुरुबा जातीचे. विद्यमान मुख्यमंत्री सिद्धरामय्या त्याच जातीतील. पण त्या जातीचे पाठबळ मिळविण्यात सिद्धरामय्या यांनी जे यश मिळविले तसे ईश्वरप्पा मिळवू शकले नाहीत. त्यानंतर त्यांनी जाती संघटनेची स्थापना अवश्य केली. पण सिद्धरामय्या यांचा दबदबा तोवर वाढला होता आणि ईश्वरप्पा यांना तशी व्यूहरचना आखण्यात यश आले नाही. अर्थात आपण केवळ कुरुबा समाजाचे नेते नसून हिंदुत्वाचे पुरस्कर्ते आहोत असे नंतर त्यांनी एकदा सांगितले होते.

२०१० मध्ये ईश्वरप्पा पुन्हा प्रदेशाध्यक्षपद बनले. २०१२ मध्ये सदानंद गौडा यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यांनतर जगदीश शेट्टर मुख्यमंत्री झाले. त्या मंत्रिमंडळात ईश्वरप्पा उपमुख्यमंत्री होते. २०१३ च्या विधानसभा निवडणुकीत ते पराभूत झाले; तेंव्हा पुढच्याच वर्षी पक्षाने त्यांना राज्याच्या विधान परिषदेवर निवडून आणले. २०१८ मध्ये मात्र ते पुन्हा विधानसभेवर निवडून आले. त्यांनतर येडियुरप्पा आणि अगदी अलीकडच्या बसवराज बोम्मई सरकारमध्ये ईश्वरप्पा मंत्री होते. मुख्यमंत्रिपदाने मात्र त्यांना सतत हुलकावणी दिली.

कुरुबा जाती संघटना ईश्वरप्पा यांनी स्थापन केल्यानंतर ते आणि येडियुरप्पा यांच्यातील अंतर वाढत होतेच; तरीही येडियुरप्पा यांच्या मंत्रिमंडळात ते मंत्री होते. मात्र सरकारच्या कारभारात येडियुरप्पा कुटुंबीय हस्तक्षेप करतात असा गंभीर आरोप २०२१ मध्ये ईश्वरप्पा यांनी केला होता. त्यानंतर हे संबंध अधिकच दुरावले. आपण केलेल्या सरकारी कामाचे बिल चुकते करून घेण्यासाठी आपल्याकडे चाळीस टक्के कमिशन मागितले जात असल्याचा आरोप २०२२ मध्ये संतोष पाटील नावाच्या एका ठेकेदाराने केल्याने खळबळ माजली; यात त्यांनी ईश्वरप्पा यांचे नाव घेतले होते.. एप्रिल २०२२ मध्ये संतोष पाटील यांनी आत्महत्या केल्याने प्रकरणाला गंभीर वळण लागले. अखेरीस ईश्वरप्पा यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

लोकसंसद

## राजकीय धुळवड आणि एकमेकांवर चिखलफेक

देशात १८ व्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यातच सध्याचे राजकीय वातावरण इतके गढूळ झाले आहे की यंदाच्या राजकीय धुळवडीत एकमेकांवर राजकीय चिखलफेक करताना असंस्कृत भाषेची परीसीमा गाठली जाणार याचा प्रत्यय यायला लागला आहे. 'तो विंचू आम्हाला आधी डसला', 'ती तर शकुनी मामाची चाल', 'चंदा घेऊन धंदा करणे हे त्यांचे काम', 'चमचे तर सर्वत्रच असतात, ते फक्त आपला कप बदलतात' ही अगदी अलीकडची राजकीय पटलवरील काही विधाने. जसजशी निवडणुकीची तारीख जवळ येत जाईल तसतशा राजकीय उखाळ्या पाखाळ्यांना आणखी धार येईल आणि टीकेचा स्तर अधिकाधिक खालावत जाईल. राजकीय जीवनात वावरताना मतभेद होणे स्वाभाविक आणि अपेक्षित आहे. एक काळ असा होता जेव्हा भारतीय राजकारणात इंदिरा गांधी, जयप्रकाश नारायण, मधु दंडवते, यशवंतराव चव्हाण, जॉर्ज फर्नांडीस, ज्योती बसू, अटलबिहारी वाजपेयी असे भिन्न राजकीय विचारधारा असलेले लोक कार्यरत होते. परंतु ही उतुंग व्यक्तिमत्वांची माणसे निवडणुकांच्या सभांमधून विरोधकांना व्यक्तिशः लक्ष्य न करता फक्त जनतेच्या समस्यांवर बोलायची. परंतु सध्या सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेलेल्या दिसत आहेत.

**- प्रदीप मोरे,** अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

### सव्वीस मार्च

**१९०९:-** लेखक, गोवा मुक्ति तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक बिनीचे शिलेदार बाळकृष्ण सातोस्कर यांचा जन्म. 'लॅटिन, फ्रेंच, इंग्लिश, पोर्तुगीज, कोकणी' आदी भाषांचे जाणकार. ह्यांची 'अनुया' ही चित्रकलेवरील मराठीतील पहिलीच कादंबरी, 'अभिराम', 'आई', 'आज मुक्त चांदणे भाग १,२', 'ही गोवा मुक्ती संग्रामावर', 'मॅनेजिंग डायरेक्टर', 'मेनका', 'रक्तहीन क्रांती' ह्या त्यांच्या आणखी काही कादंबऱ्या. याशिवाय 'उदंड जाहले पाणी' हे नाटक, 'द्राक्षांच्या देशात' हे पोर्तुगीज कथांचे, 'पंचविशीतले पाप' हे फ्रेंच लेखक मॉ पास्तांच्या कथांच्या भाषांतरासह गोमंतक, प्रकृती व संस्कृती खंड १,२,३ 'गोव्याची भाषा मराठी व बोली कोकणी', 'ग्रंथ व ग्रंथालयीन चळवळ', 'सांगिला' हा निबंध संग्रह, 'स्मरण' हा मृत्यूलेख संग्रह आणि काही बालसाहित्य मिळून ५० हून अधिक ग्रंथ प्रकाशित. **१९१८:-** भारतीय षडदर्शनशास्त्रांचे अभ्यासक आणि तात्विक ग्रंथाचे लेखक हरी गणेश गोडबोले यांचे निधन. 'आत्मविद्या आणि जिवितविद्या' हे दोन तत्वविवेचनात्मक ग्रंथ लिहिले. ते वैदिक धर्माचे कडवे अभिमानी आणि वेदांतशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. **१९३०:-** मुंबई इलाख्याचे गॅझेटियर तयार करण्यात सहभाग असलेले मानववंशशास्त्र व इतिहासाचे अभ्यासक पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी यांचे निधन. ते कवी होते, त्यांचे सात संग्रहदेखील प्रकाशित झाले होते. तसेच उत्तर कोकणचा इतिहास त्यांनी लिहिला. याशिवाय 'इतिहास संशोधन' व 'ॲन्थ्रापॉलॉजी' या विषयावर त्यांनी निबंध लिहिले. **१९३७:-** लेखक पेशाने डॉक्टर आणि मराठी विश्वकोशाचे वैद्यक शास्त्रातील अभ्यासक संपादक डॉ. श्यामकांत सखाराम कुलकर्णी यांचा जन्म. 'अनुराग' या कादंबरीसह, 'अरुंद वळणावर', 'दूर गेलेली नौका' ही वैद्यकीय अनुभवांवर, 'रणरागिणी झाशीवाली' हा पोवाडा तसेच 'शोधक दृष्टीकोनातून आधुनिक वैद्यकशास्त्र भाग १,२', 'हार्ट ॲटॅकनंतर पुढे' या ग्रंथातून प्रश्नोत्तर रुपात वैद्यकीय माहिती, अशी साहित्य संपदा. **१९३९:-** सामाजिक बांधिलकी जपत, पुरोगामी विचारांची पाठराखण करुन आपली मते ठामपणे मांडणाऱ्या लेखिका, समीक्षक, सामाजिक कार्यकर्त्या प्रा. पुष्पा अनंत भावे यांचा जन्म. मराठी रंगभूमी आणि नाटक या विषयावर त्यांनी विपूल प्रमाणात लेखन केले. नाट्य समीक्षेबाबत अत्यंत मूलगामी विचारांमुळे त्यांच्या समीक्षेचा दबदबा होता. 'अभिरुची ग्रामीण आणि नागर', 'मराठी टीका', 'महात्मा फुले गौरव ग्रंथ' इत्यादींच्या संपादनात त्यांचा मोलाचा वाटा विविध ज्ञानविस्तार लेख सूचीचेही त्यांनी संकलन केले आहे. याशिवाय 'मराठवाडा नामांतर चळवळ', 'महिलांचे प्रश्न', 'नर्मदा बचाव', 'अण्णा हजारेंचे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन आदी चळवळीत त्या सहभागी होत्या. सुप्रसिध्द निवेदक आणि बालसाहित्यिक अनंत भावे त्यांचे पती. **१९४३:-** कादंबरी, निबंध, प्रवासवर्णन, काव्य आदी वाङ्‌मयप्रकार हाताळून समीक्षा व वैचारिक लेखन करणारे डॉ.यशवंत राजाराम मनोहर यांचा जन्म. 'मंडळ आयोग : भ्रम आणि सत्य' तर 'दलित साहित्य : सिध्दांत आणि स्वरुप', 'निबंधकार डॉ. आंबेडकर', 'सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा', 'प्रबोधन विचार' इत्यादी पुस्तके प्रसिध्द. **१९४३:-** लेखक डॉ.प्रा. राजशेखर गंगाधर हिरेमठ यांचा जन्म. 'मराठी व्याकरण परिचय', 'गझल : रंग आणि गंध' या समीक्षात्मक ग्रंथासह दोनएकशे लेख विविध विषयांवर प्रसिध्द. **१९४६:-** एक विचारवंत लेखिका, नाटक आणि रंगभूमीविषयी भरपूर लेखन आणि टीकात्मक समीक्षा करणाऱ्या लेखिका ओळखल्या जाणाऱ्या पुष्पा भावे यांचा जन्म. एक प्रभावी वक्त्या म्हणून त्या प्रसिध्द आहेत. अतिशय मुद्देसूद आणि विद्वतापूर्ण असे त्यांचे वक्तृत्व ऐकणाऱ्याला वैचारिक खाद्य देते. त्यांचे भाषण म्हणजे श्रोत्यांना एक प्रकारची मेजवानीच असते. त्यांनी अनेक विषयांवर लेखन केले. त्यांपैकी 'अभिरुची : ग्रामीण आणि नागर' (संपादक-गो.म.कुलकर्णी), 'मराठी टीका' (संपादक-वसंत दावत), 'महात्मा फुले गौरव ग्रंथ' इ. ग्रंथांसाठी त्यांनी लिखाण केले आहे. याशिवाय विविध ज्ञानविस्तार लेख सूचीचे संकलनही त्यांच्या नावावर आहे. सामाजिक कार्यकर्त्या म्हणूनही त्या प्रसिध्द आहेत. **१९४९:-** गांधीचरित्र लिहिणाऱ्या अवंतिकाबाई गोखले यांचे निधन. त्यांच्या पुस्तकाला लो.टिळकांची प्रस्तावना आहे. गांधीजीच्या आंदोलनात अवंतिकाबाई सहभागी असल्याने त्यांच्या पुस्तकाला विशेष महत्त्व आहे. याखेरीज हिंदू महिला समाजाची स्थापना त्यांनी केली. **१९५७:-** कवी हृदय बलवंत चक्रधर यांचा जन्म. 'भुकेची भुपाळी' हा काव्यसंग्रह तसेच 'गजल अजिंठा' ह्या प्रतिनिधिक मराठी गजल संग्रहाचे संपादन. **१९६३:-** कथालेखक पंडित शेटे तथा श्रीधर परशुराम शेटे यांचा जन्म. वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी त्यांचे अकाली निधन झाले. त्यांनी विपुल प्रमाणात समीक्षात्मक लेख, एकांकिका, कथा लिहिल्या. त्यापैकी 'दुपार' हा एक कथासंग्रह त्यांचा प्रकाशित. समाजाच्या सर्व थरातील लोकांच्या जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण असणाऱ्या त्यांच्या कथा मनाला भावतात. **२००८:-** विद्रोहासोबत मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारे पहिले मराठी दलित साहित्यकार बाबूराव बागूल यांचे निधन. 'जेव्हा मी जात चोरली','मरण स्वस्त होत आहे' हे कथासंग्रह, ८ कादंबऱ्या. 'दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान' (नवसमीक्षा) आदी पुस्तकांखेरीज, साहित्य अकादमीने त्यांचे निवडक साहित्य प्रकाशित केले आहे.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ मार्च
१) श्री. घनश्याम शंकर थळे
२६-३-१९५०
वरसोली, अलिबाग,

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# स्वच्छतागृहांचीच स्वच्छता वाऱ्यावर

## उरण नगरपरिषदेने फिरवली पाठ; तहसीलदार, पोलीस झाले हतबल

। उरण । वार्ताहर ।
**उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांनी सातत्याने उरण तहसील कार्यालय व उरण पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील शौचालयाच्या स्वच्छतागृहांकडे दुर्लक्ष केल्याने मोठ्या प्रमाणात शौचालयाची दुरवस्था झाली आहे, अशी चर्चा आहे. दरम्यान, त्याचा त्रास शासकीय अधिकारी, पोलीस यंत्रणेबरोबर तालुक्यातील नागरिकांना सहन करावा लागत असून, आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.**



उरण तहसील कार्यालय व पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उरण नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग उरण यांच्या कार्यक्षेत्रात उरण तहसील कार्यालय व तालुक्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणारे उरण पोलीस ठाणे यांची एकाच ठिकाणी कार्यालय आहेत. या दोन्ही महत्त्वाच्या परिसरातील इमारतींची दुरुस्ती करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग उरण व स्वच्छतेबाबत उरण नगर परिषद यांची महत्वाची भूमिका आहे. मात्र, दोन्ही कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शौचालयाच्या स्वच्छतागृहाकडे व परिसरातील स्वच्छतेकडे सार्वजनिक बांधकाम विभाग उरण व उरण नगर परिषद दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे परिसरातील स्वच्छतेचा प्रश्न गहन बनला आहे. त्याचबरोबर शौचालयात पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने व घाणीचे साम्राज्य पसरल्याने शासकीय अधिकारी, पोलीस यंत्रणेबरोबर कार्यालयात ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. तरी ही उरण नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग उरण हे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

यासंदर्भात उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्याकडे वारंवार मोबाईल फोनवरून संपर्क साधला असता मार्चअखेर असल्याने सध्या ते विकासकामातील ठेकेदारांची बिले काढण्यात दंग असल्याचे समजत आहे.

## कारच्या धडकेने एक जखमी

**पनवेल :** कारने मोटारसायकलला धडक दिल्याने कमलेश चंद्रकांत मोझर (३३) रा. घणसोली जखमी झाला आहे. याप्रकरणी कारचालक तुळशीराम नारायण मुकादम रा. पनवेल यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कमलेश हा त्याच्या मोटारसायकलने पनवेल येथे आला. तेथून परत जाताना पनवेल गार्डन हॉटेल सिग्नलजवळ तो थांबला होता. सिग्नल मिळाल्यावर तो पुढे जात असताना बेलापूरकडून येणाऱ्या कार चालकाने त्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात कमलेश मोजर जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे दाखल करण्यात आले. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# प्रशासनाचे मतदारांना मतदानासाठी आवाहन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**
लोकसभेसाठी निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या असून, आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सुधागड तालुक्यातील भेरव गावात आयोजित सभेत मतदारांनी लोकसभेसाठी जास्तीत जास्त टक्के मतदानाचा अधिकार बजावावा यासाठी सुधागड तालुका तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

मागील लोकसभा निवडणुकीला भेरव येथील मतदार केंद्रावर केवळ १६ टक्के इतकेच मतदान झाले होते. त्यामुळे यावेळी हा टक्का वाढावा यासाठी तहसीलदारांकडून मतदारांना आवाहन करण्यात आले. आपले मत हे अमूल्य आहे. संविधानाने आपल्याला आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिलेला आहे. आपल्या मताची शासन स्तरावर नोंद झाली पाहिजे. आपले मत वाया जाऊ नये तसेच ठाणे, मुंबई, पुण्यासारख्या बाहेरगावी राहणाऱ्या मतदारांनादेखील मतदानासाठी येण्याचे व बहुसंखेने उपस्थित राहून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे यांनी केले आहे.

यावेळी मंडळ अधिकारी अंकुश साळवे, तलाठी उद्धव गुंजाळ, पोलीस पाटील अमिषा सागळे, सामाजिक कार्यकर्ते अतिश सागळे, सतीश मांढरे, मंगेश मांढरे, अंगणवाडी सेविका सोनाली मांढरे, दीपक पुशीलकर, रामचंद्र मोरे, प्रभाकर टक्के शाळेतील शिक्षिका रश्मी लखीमळे तसेच महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

## संत रोहिदास जयंती साजरी

**। कोर्लई । वार्ताहर ।**
रोहिदास समाज पंचायत संघ मुंबई यांच्या विभाग समिती क्रमांक ८ कुर्ला यांच्यातर्फे कुर्ला नेहरू नगर येथे प्रबोधनकार ठाकरे सभागृहात होळी सणाचे औचित्य साधून संत रोहिदास जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.

याप्रसंगी गणेश विठ्ठल चव्हाण, संतोष तुकाराम गोठणकर, छगन शिवराम खेडेकर, साक्षी संजय जानवलकर, ज्योती दिपक पाटणकर, डॉ. सुभाष रामचंद्र सोनंदकर आणि शशिकांत राजाराम सावंत आदी मान्यवर, समाज बांधव व विशेष करून महिला यावेळी उपस्थित होत्या. यावेळी विशेष सत्कार म्हणून क्रीडारत्न बळीराम सुसवीरकर यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा विशेष जाहीर सत्कार करण्यात आला.

# ‘ताराराणी’कडून आदिवासींची होळी गोड

## २५० आदिवासी बांधवांना पुरण पोळीचे जेवण



**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**
सामाजिक दायित्व जपणाऱ्या मुरूड येथील स्वराज्य सौदामिनी ताराराणी ढोल-ताशा पथकाने केवळ व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता होळी सणात आदिवासी बांधवांना सामील करून उदात्त कार्य आदिवासी वाड्यांवर जाऊन केले असून, त्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

संपूर्ण महिला सदस्य असणाऱ्या मुरूड स्वराज्य सौदामिनी ताराराणी ढोल ताशा पथकाची स्थापना एक वर्षापूर्वी झाली. केवळ व्यवसाय हा दृष्टिकोन न ठेवता पथकाने ढोलवादन, करमणुकीबरोबरच विविध क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प सर्वांनी सोडला आहे. त्याप्रमाणे पहिल्या वर्धापनदिनी पथकातील सर्व वादकांनी एकत्र येऊन तालुक्यातील शिघ्रे नवीवाडी, आगरदांडा आदिवासी वाडी, तिसले आदिवासी वाडी येथे प्रत्यक्ष जाऊन सुमारे २५० बांधवांना भात, वरण, भाजी, पुरण पोळीचे जेवण खाऊ घातले आणि आदिवासी बांधवांना होलिकोसत्वातील आनंदात सहभागी करून घेतले.

याप्रसंगी मृणाल खोत-गुरव, इशिक ठाकूर, समिधा उपाध्ये, राजश्री गोंजी, स्नेहा पटेल, स्पृहा लखमदे, निलांबरी हणमंते, ईशा चांदोरकर, अर्चना कोळवनकर, श्रद्धा उमरोटकर, वैशाली भावसार आदींनी उपस्थित राहून सामाजिक समरसता आणि एकात्मतेचे दर्शन घडविले आहे.

## पेण येथे तुकाराम महाराज बीजोत्सव

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**
पेण तालुक्यातील तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या धोंडपाडा येथे श्री संत तुकाराम महारान बीजोत्सव अखंड हरीनाम सप्ताह सुरु झाला. सप्ताह गुरुवारी दि.२८ मार्चपर्यंत साजरा होणार आहे.



सप्ताहात पहाटे ४ वाजता काकडा, ५.३० वाजता ज्ञानेश्वरी वाचन, ८.३० वाजता गाथा पारायण, सायंकाळी ६ वाजता प्रवचन, ७.३० वाजता हरीपाठ. प्रथम दिवसाचे प्रवचन दिलीप ओढांगी, संदीप भोईर, रमाकांत कोप्रोली, चंदन रावे, माधवराव पाटील, अक्षय भगत, ज्ञानेश्वर पाटील, तसेच किर्तन संतोष कंधारकर, पुरुषोत्तम पाटील, संग्राम बापू भंडारे, गोविंगोरे, सुरेश सूल, गणेश हुंबाड, उल्हास सूर्यवंशी यांचे कार्यक्रम पार पडतील.

तर, वैकुंठ गमनाचे किर्तन बुधवार दि.२७ मार्च रोजी सकाळी १० वाजता होणार असून गुरुवार २८ मार्च रोजी सकाळी १० वाजता केहान घुले यांचे किर्तन होईल. या सर्व वारकरी किर्तनाला मृदुंग साथ माधन महाराज उखळीकर परळी वैजनाथ यांची लाभणार आहे.

# आळंदी येथे कीर्तनकार कार्यशाळा

**। आळंदी । प्रतिनिधी ।**
कीर्तनकारांनी सांप्रदायिक, सामाजिक कार्याच्या समवेत राष्ट्र आणि धर्म यांसाठी सजग राहिले पाहिजे, असे मत महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाचे सचिव नरहरी चौधरी यांनी व्यक्त केले. आळंदी (पुणे) येथील डांगे पंच मंडळ कार्यालयात कीर्तनकार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.




नरहरी चौधरी पुढे म्हणाले की, हिंदु जनजागृती समिती समवेत गेली अनेक वर्षे कार्य करत आहे. वारकरी संप्रदाय आणि समितीने राज्यात एकत्रितपणे अनेक मोहिमा यशस्वीपणे राबवल्या आहेत. या कार्यशाळेतून जे ज्ञान मिळेल, ते आपण आपल्या प्रवचनाच्या माध्यमातून सर्व समाजात पोचवले पाहिजे.

यावेळी बंडातात्या कऱ्हाडकर, आत्माराम महाराज, रामचंद्र पेनोरे, पद्माकर पाटोळे, पंडित क्षीरसागर, राम सूर्यवंशी, रघुनाथ बापू चौधरी, आत्माराम शास्त्री, निरंजन शास्त्री, कोठेकर महाराज, दत्तात्रय चोरघे आणि सुनील घनवट उपस्थित होते. या कार्यशाळेत राष्ट्र आणि धर्म यांवर होणारे आघात, तसेच लव्ह जिहाद, हलाल जिहाद आदींविषयी विविध वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

## चिंतामण पाटील यांचे निधन

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**
पेण शहरातील रामवाडी येथील चिंतामण कमळ पाटील यांना वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंड असा मोठा परिवार आहे. इंचगिरी सांप्रदायाचे सद्गुरू शंकर महाराज रसाळ यांचे ते पट शिष्य होते. त्यांचे दहावे बुधवारी (दि.२७) समर्थांच्या समाधी ठिकाणी जेऊर येथे होईल. तर बारावे शुक्रवारी (दि.२९) त्यांच्या राहत्या घरी रामवाडी येथे होईल.

## आदिवासी बांधवांना अन्नधान्य वाटप



**। उरण । वार्ताहर ।**
होळीचा सण आणि याच अविट गोड सणात आपल्या बाळ-गोपाळांसोबत सण आनंदात साजरा व्हावा या विचारांच्या विवंचनेत असणाऱ्या आदिवासी बांधवांना महागाईच्या काळात आपल्या संसाराचा गाडा चालवताना जीव मेटाकुटीला येत असतो. या आदिवासी बांधवांची होळी आनंदात साजरी व्हावी याकरीता राजू मुंबईकर यांनी रानसई येथील खोंड्याची वाडी, मार्गाची वाडी, भुर्याची वाडी, बंगल्याची वाडी, खैरकाठी, सागाची वाडी, केळ्याचा माळ, वेश्वी आदिवास वाडीतील सर्व आदिवासी बांधवांच्यां कुटुंबांना तब्बल अडीचशे किलो चणे-हरभरे वाटप केले.

# पाचवीतील वैदहीचा आदर्श कित्ता

### शाळेच्या दुरुस्तीसाठी विद्यार्थिनीची देणगी

### व्याख्यानाच्या मानधनातून काही रक्कम शाळेसाठी

**। पनवेल । वार्ताहर ।**
आपल्या आई-वडिलांकडून वेगवेगळे शालेय साहित्य, त्याचबरोबर खाऊसाठी पैसे मिळावे यासाठी मुलं हट्ट करतात. तो त्यांचा दोष नसतो, तर त्यांचे वय हे खेळण्या-बागडण्याचे असते. मात्र, करंजाडे येथील रहिवासी असणाऱ्या वैदही विक्रम मोरे ही पाचवीतील विद्यार्थिनी शिव व्याख्यान सर्वत्र देत आहे. या मुलीने आपल्या मानधनातील काही रक्कम आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता शिक्षकांकडे सुपूर्द केली आहे. या माध्यमातून वैदेहीने एक प्रकारे आदर्शाचा कित्ता गिरवला आहे.

शाळा ही गावची प्रतिकृती असते आणि शिक्षक ही त्या शाळेची प्रतिकृती असते. विद्यार्थी शिक्षकांची प्रतिकृती समजली जाते. कारण, या मूलरूपी गोळ्यांना घडवण्याचे तसेच आकार आणि वळण देण्याचे काम हे शिक्षक करतात. आदर्श पिढी घडवण्यात शाळेचा खूप मोठा वाटा असतो. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आपली संस्कृती जपण्याच्या उद्देशाने अनेक शाळांमध्ये शिकवण दिली जाते. त्यामध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नवीन पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल.

सध्या शिक्षणाचे व्यापारीकरण व बाजारीकरण झाले आहे. खासगी शाळांमधून मोठ्या प्रमाणात शुल्क वसूल केले जाते. परंतु, त्याला नवीन पनवेल येथील फडके विद्यालय अपवाद आहे. संस्कारक्षम पिढी घडवण्याचे काम या शाळेतून केले जाते. त्याचबरोबर दर्जेदार शिक्षणासाठी ही शाळा सर्वपरिचित आहे. इयत्ता पाचवी शिकणारी वैदही विक्रम मोरे ही लहानगी विद्यार्थिनी शिवव्याख्याती म्हणून ओळखली जाते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर ती प्रबोधन करते. आतापर्यंत अनेक ठिकाणी तिने या विषयावर व्याख्यान केले आहे. त्यासाठी वेगवेगळ्या सामाजिक संस्था आणि आयोजकांकडून फुल ना फुलाची पाकळी म्हणून तिला मानधन दिले जाते. त्यातून आपल्या शाळेच्या दुरुस्तीकरिता वैदहीने काही रक्कम नुकतीच शिक्षकांकडे सुपूर्द केली आहे.

## धगडवाडी येथे शिक्षण परिषद संपन्न

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**
रा.जि.प. शाळा धगडवाडी रोहा येथे मासिक गटशिक्षणाधिकार मेघना धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुंदन जाधव यांनी केले. केंद्रस्तरीय निपुण भारत अभियान कार्यक्रमात प्रथम क्रमांक कामथ, द्वितीय क्रमांक येरळ व तृतीय क्रमांक चिंचवली तर्फे आतोणे शाळेने मिळवले. विजेते शाळांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी ‘समग्र प्रगती पुस्तक’ भागवत भुसारे, सी.सी.ई. मार्गदर्शन प्रशांत वाघचौरे तर ‘व्यावसायिकमार्गदर्शनवमानसशास्त्रीय समुपदेशन’ या विषयी अरुण शेळके यांनी सखोल माहिती दिली.

# खडकवासला जलाशय रक्षण अभियान



**। पुणे । प्रतिनिधी ।**
धूलिवंदन आणि रंगपंचमी या दिवशी आयोजित केले जाणारे ‘खडकवासला जलाशय रक्षण अभियान’ सलग २२ व्या वर्षीही शतप्रतिशत यशस्वी झाले. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चार धरणांपैकी खडकवासला या धरणात १.१९ टीएमसी पाणीसाठा आहे. त्यामुळे त्यातून पुण्याची तहान भागवली जाते. धूलिवंदन वा रंगपंचमी यांमुळे हे पिण्याचे पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून ही समाजहितकारी चळवळ २२ वर्षे राबवली जात आहे.

महाराष्ट्राला पाणी टंचाईचे संकट भेडसावत असतांना या मोहिमेला विशेष महत्त्व आहे. हिंदु जनजागृती समिती, खडकवासला ग्रामस्थ आणि समविचारी संघटनेच्यावतीने हे अभियान २५ मार्च या दिवशी राबवण्यात आले. यावेळी हिंदु जनजागृती समितीच्या कार्यकर्त्यांनी खडकवासला जलाशयाभोवती मानवी साखळी करून नागरिकांचे प्रबोधन केले आणि त्यांना धरणामध्ये उतरू दिले नाही. धूलिवंदन आणि रंगपंचमी या दिवशी रंग खेळून जलाशयात उतरणे, हिंदु सणांच्या नावाखाली होणारे अपप्रकार थांबवणे, तसेच हिंदूंना धर्मशास्त्र माहिती व्हावे, यासाठी हिंदु जनजागृती समिती प्रारंभीपासून प्रबोधन करत आहे. अशाच प्रकारे रंगपंचमीच्या दिवशी म्हणजे ३० मार्चलाही हे अभियान राबवण्यात येणार आहे.

# होळीच्या दिवशी सामूहिक मासेमारीची परंपरा

। उरण । वार्ताहर ।
**उरण पूर्व विभागातील ग्रामीण भागात आज ही संस्कृतीचा ठेवा कायम जपला गेला आहे. होळीच्या दिवशी नटून थटून थाटात होळी साजरी करून दुसऱ्या दिवशी मांसाहारी जेवणावर ताव मारण्याची पद्धत सर्वत्र आहे. मात्र, याच दिवशी पूर्व विभागातील गावात मात्र खास गावात तळे मारण्याचा कार्यक्रम असतो. हा कार्यक्रम म्हणजे सामूहिक मासेमारी. मासेमारी निमित्त लोकांना एकत्र आणण्यासाठी एक वेगळा प्रयत्न पूर्वापार सुरू आहे.**



उरणमधील गावच्या सामाईक तलावावर मासेमारी

उरण पूर्व विभागातील कळंबुसरे, सारडे, वशेणी, पुनाडे, पाले, आवरे गोवठणे, पिरकोण, पाणदिवे कोप्रोली, खोपटे या गावात विस्तीर्ण तलाव लाभलेला आहे. गावातील सर्व प्रथा-परंपरांचे केंद्रस्थान म्हणजे हा तलाव. अगदी लग्नापासून गणपती विसर्जनापर्यंत परंपरा जपण्याच काम गावचा तळा करतो. होळी व धुळवडीच्या दिवशी गावात तळा मारण्याचा कार्यक्रम असतो. हा कार्यक्रम म्हणजे सामूहिक मासेमारी करणे असते. गावातील सर्वजण मिळून एकाच वेळेस मासे पकडण्यासाठी जमतात.

तळा मारण्याच्या उत्सवाची लगबग आधीच्या दिवसापासूनच सुरू होते व गावातील बरेचसे लोक इतर गावांतील लोक ‘आसू’ मिळवण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. कारण, तळा मारण्यासाठीचा एकमेव नियम म्हणजे फक्त आसूचा वापर करणे असते. कधी कधी मोठं जाळी वापरली जाते, त्याला यंडी म्हणतात. ती दोन व्यक्ती वापरू शकतात. आसू हे एकाच व्यक्तीला वापरता येण्याजोगे मासेमारीचे साधन आहे. लवचिक वेताच्या दांडी वाकवून त्याभोवती विणलेले मासे पकडण्याचे जाळे म्हणजे आसू होय. गावातील सर्वच कुटुंबांकडे हे आसू असते.

तळा मारण्याआधी गावात ‘हाक मारली काय?’ त्याला शुद्ध भाषेत दवंडी असे म्हणता ‘तळा मारण्याचा’ दिवस व वेळ निश्चित करून दुसऱ्या दिवशी सकाळी सात आठ वाजल्यापासूनच तळ्यावर गर्दी जमा होऊ लागते. हातात आसू आणि मासे साठवण्यासाठी पिशवी, बरणी, डोबुकरी आणली जात असून, पकडलेले मासे सांभाळण्यासाठी कुटुंबातील एखादी व्यक्ती असते. शिवाय प्रत्यक्ष मासेमारांसह उत्साही प्रेक्षकही तळ्याकाठी जमलेले असतात. मासेमारी आधी नारळ अर्पण केला जातो. तळ्याच्या काठावरील लोक तळ्यात प्रवेश करून मासे पकडण्यास सुरुवात करतात. एकाच वेळेस मोठ्या प्रमाणात नागरिक पाण्यात उतरल्याने पाणी ढवळले जाते व मासे वर येऊ लागतात. कटल्यांसारखे मोठे मासे मिळतात. तसेच, सर्व जातींचे मासे एकत्र केले जातात व पकडणाऱ्यांना त्यांचा वाटा दिला जातो. त्यानंतर गावात पुरुष असतील, त्याप्रमाणे मासे वाटले जातात व जिताडा शिवरा यासारख्या मोठ्या माशांचा लिलाव केला जातो.

**आगरी समाज हा मोठ्या प्रमाणात मांसाहारी असा समाज आहे, त्यामुळे इथे धुळवडीच्या दिवशी घरोघरी मांसाहारी जेवणाचा बेत असतो. वर्षभर जपणूक केलेल्या मासळीची गावच्या तलावात धुळवडीच्या दिवशी सकाळी संपूर्ण ग्रामस्थ मासेमारी करतात. या तलावातील मासे घरी घेऊन जातात. अर्थात, हे गोड्या पाण्यातले मासे असले तरी चविष्ट असतात.**
**– अशोक पाटील, ग्रामस्थ**

### वर्षानुवर्षाची परंपरा

**गावकीच्या वतीने माशांचे बी पाण्यात सोडण्यात येते. त्यामुळे कटला, जिताडा, शिवरा हे मासेही सापडतात. तसा मासेमारीसुद्धा शेतीप्रमाणेच बेरभरवशाचा प्रकार असल्याने तळा मारताना आपले जाळे रिकामे राहण्याचे प्रसंगही येतात. कधीकधी अधिक मिळवलेले मासे नातेवाईक व मित्र मंडळी यांना भेट म्हणून दिले जातात. या दिवशी गावात प्रत्येक घरात माशांची मेजवानी असते. तळा मारण्याची परंपरा गावात गेली कित्येक वर्षांपासून रूढ असल्याने आज ही होळीच्या दिवशी सर्व लोक आपली रुढी परंपरा यांचे जतन करता तलावातील मासेमारीतून दिसून येत आहे.**

# रायगडात होलिकोत्सावाची धूम

जिल्ह्यात विशेषत: ग्रामीण भागात होलिकोत्सव साजरा करण्याची मोठी परंपरा आहे. या प्रदीर्घ परंपरेला शिमगा किंवा होळी म्हणतात. जिल्ह्यात हा होलिकोत्सव जोरदारपणे साजरा केला जातो. होळीचे आजचे स्वरूप बदलले असले तरी येथील काही जुन्या परंपरा अजून कायम टिकून आहेत. प्रत्येक गावागावात वाडीवस्तीत होळीचा सण आनंदाने साजरा करण्यात आला.







## मुरुड कोळीवाड्यातील होळीची परंपरा

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

भारतभर होळी मोठ्या उत्साहामध्ये साजरी केली जाते. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे होळीचा सण फाल्गुन महिन्यामधील पौर्णिमेच्या दिवशी साजरा करण्याची प्रथा आहे. होळीच्या दिवशी रात्री होलिका दहन असते. शहरांमध्ये होळीच्या दुसऱ्या दिवशी रंग खेळले जातात. होळी पौर्णिमेनंतर पाच दिवसांनी रंगपंचमी येते. पूर्वी होळी-रंगपंचमीनंतर उन्हाळ्याला सुरुवात झाली असे म्हटले जात असे. मुरुड तालुक्यात होळीचे थोडे वेगळे रूप पाहायला मिळविते. होळी (शिमगा ) सण प्रामुख्याने कोळी समजात मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. मुरुडच्या प्रथेनुसार १५ दिवस अगोदर होळीला होळीच्या माळावर छोटी होळीसाठी खडा खणून त्यात रात्री सुपारीचे झाड होळीत जाळले जाते.लहान मोठे सर्वच होळीच्या सणात सामील होतात.ढोल ताशा वाजवत नाचत दिवस संपतो.



● कर्जत तालुक्यात पारंपारिक पद्धतीनें होळी उत्सव साजरा (छायाचित्रः संजय गायकवाड)

## कोलाड विभागात शिमगोत्सव

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहे तालुक्यातील कोलाड भागातील कोलाड, सुतारवाडी, खांब या ग्रामीण विभागात मोठया उत्साहात शिमगोत्सव साजरा करण्यात आला. होळीनिमित्ताने गावोगावी क्रिकेटच्या स्पर्धा तरुणांनी भरवल्या होत्या. गावरान खालुबाजा पिपेरीच्या स्वराला नगाराचा आवाज व होळीच्या गाण्यांनी सर्वत्र वातावरण मंत्रमुग्ध करणारे ठरले.



## पारंपरिक पद्धतीने होळी साजरी

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरात पारंपरिक पद्धतीने होळीचा सण व धुळवड साजरी करण्यात आली.बारा वाड्यातील गावकऱ्यांनी लाकडे, गवत व फांद्यांनी आपापल्या होळया सजविल्या होत्या. होळी लागण्याआधी महिलांकडून होळीला पुरण पोळीचा नैवेद्य दाखवून तिचे पूजन करण्यात आले. तसेच नवस बोलून नारळ अर्पण करण्यात आले. होळी भोवती गावकऱ्यांनी 'फाग' म्हणत देवांना आमंत्रण दिले व पाच



तरुणांकडून होळी पेटविण्यात आली. जोगवाडी येथील मानाची होळी लागल्यानंतरच इतर सर्व होळया लागण्याची परंपरा तळा शहरात आजही कायम आहे.ग्रामदेवता चंडिका देवीच्या मंदिरात परंपरेनुसार होळी दहनाची राख एकमेकांना लावण्यात आली. धुळवडीच्या मिरवणुकीसाठी पारंपारिक वाद्यांचा वापर करण्यात आला होता. चंडिका देवीचे दर्शन घेतल्यानंतर पुन्हा होळीच्या स्थानावर जाऊन धुळवड ची सांगता करण्यात आली.



● नागांव खालची आळी चौक मित्रमंडळ २०२४ यांनी होळीनिमित्ताने साकारलेले राम मंदिर



● बोर्ली नगरीत चिंचबादेवी मंदिराच्या होळीच्या पटांगणावर होळीचा क्षण पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. (छायाचित्र अमेय नाझरे)

## म्हसळा तालुक्यात उत्साहाला उधाण

। म्हसळा । वार्ताहर ।

होळी हा हिंदू बांधवांचा आनंदाचा आणि उत्साहाचा सण. लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकाच्या मनात ऐकतेची आणि अखंडत्वतेची जाणीव करून सुख, समाधान देणारा हिंदू धर्मातील एक महत्वाचा सण म्हणून आजही अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेला आहे. संपूर्ण म्हसळा तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यात कोठेही कसलाही प्रकारचा अनुचित प्रकार घडला नाही. तालुक्यात सुमारे १०० ठिकाणच्यागाव आणि वाडीवस्तीवर वेगवेगळ्या प्रकारे सजावट करून हॉलिमध्ये रंग आणण्याचा प्रत्येक गाव आणि वाडीवस्तीवर करण्यात आला. शहराची मुख्य होळी गावदेव श्री धावीरमहाराज आणि त्यांचे सहकारी यांच्या नावाचा गजर करून फार मोठ्या उत्साही वातावरणात शहरातील होळीच्या खाचरात पूर्वापार साजरी करण्यात येते. पोलीस निरीक्षक पवन चौधरी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण तालुक्यात चोख बंदोबस्त तैनात केला होता.





● पनवेल खांदा वसाहत नवीन पनवेल कामोठेमध्ये विविध सोसायटीमध्ये होळी समोर गाऱ्हाणे घालून पूजा करुन होळी पेटवण्यात आली सोसायटी मधील सर्व सदस्य महिला वर्ग लहान मुले सहभागी होते.



(छायाचित्र : समीर मालोदे )

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा- (व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.

● फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही असे दोन 2BHK फ्लॅट्स त्वरीत विकणे आहेत. किंमत- ७३ लाख आणि ८३ लाख. संपर्क : ८६९८६८२१२१ (एजंट क्षमस्व)

● घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६
संपर्क - ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९

● अलिबागमध्ये सलून कामासाठी अनुभवी मुलगा पाहिजे.
मो. ९९२१०७३९६३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## पालीत पोळ्यांचे संकलन

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

**दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील महोळी करु लहान, पोळी करु दानफअसे आवाहन महाराष्ट्र अंनिसने केले होते. त्यानुसार पालीतील तरुण व सुज्ञ नागरिक तसेच महा. अंनिस पाली-सुधागड शाखेचे पदाधिकारी यांनी रविवारी (दि.२४) रात्री नगरपंचायत हद्दीतील होळ्यांवरून जवळपास सहाशेहुन अधिक पोळ्या संकलित केल्या. आणि सोमवारी (दि.२५) या पोळ्या आदिवासी वाड्या-पाड्यांवर वाटून आदिवासी व गरिबांची होळी गोड करण्यात आली. यंदाही लोकांनी या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिला.**

'होळी लहान करू या, पोळी दान करू या' या कार्यक्रमाच्या पाठीमागे सुद्धा राष्ट्रीय संपत्तीचे होणारे नुकसान टाळणे व पर्यावरणाचे प्रदूषण थांबवणे हा उद्देश आहे. हा उद्देश सफल करण्यासाठी हा उपक्रम राबिवला गेला. पालीतील विविध ठिकाणच्या नागरिकांनी आधीच खोक्यांमध्ये योग्य प्रकारे पोळ्या भरून ठेवल्या होत्या. या पोळ्या बुरुडआळी येथील श्री बापूजी मंदिरात जमा करण्यात आल्या. महा. अंनिस सुधागड-पाली शाखेचे कार्याध्यक्ष अमित निंबाळकर व पदाधिकारी रोशन रुईकर यांनी रविवारी (ता.२४) होळीच्या रात्री पालीतील सर्व होळ्यांवर जावून पोळ्या जमा करण्यासाठी प्लास्टिक पिशव्या वाटल्या. त्यामध्ये व खोक्यात लोकांनी व्यवस्थितरीत्या पोळ्या संकलित करून ठेवल्या. ठिकठिकाणी लोकांनी उत्स्फुर्तपणे स्वतःहून पुढे येऊन पोळ्या आणून दिल्या. त्यामुळे होळीत जाणाऱ्या शेकडो पोळ्या गरिबांच्या मुखी लागल्या. पालीतील सर्व आळ्यांमधील तसेच झाप, बुरमाळी या गावांमधील होळ्यांवरुन पोळ्या दान करण्यात आल्या. अंनिस कार्यकर्ते व नागरिकांनी सुधागड तालुक्यातील दापोडे व तळई या आदिवासीवाडी आणि टेंबी वसाहतीमध्ये या पोळ्यावाटून आदिवासी अबाल-वृद्धांचे तोंड गोड केले.



> **पाली नगरपंचायत हद्दीतील सर्वच नागरिकांनी या उपक्रमाला खूप मोलाची साथ दिली आहे. मागील अनेक वर्षांपासून नागरिकांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी होत आहे. परिणामी आदिवासी वाड्यापाड्यावरील नागरिकांची होळी गोड होत आहे.**
> **-रोशन रुईकर, तरुण, पाली**

यावेळी पाली अंनिस शाखेचे अमित निंबाळकर, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय सावंत, मयूर थळे व रोशन रुईकर आदी तरुण सहभागी होते.

# सरकारी मालमत्तेत कचऱ्याचे ढीग

## पालिकेकडून स्वच्छतेबाबत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत शहरातील अनेक शासकीय वास्तू मोडकळीस आल्याने वापरात नाहीत. त्यामुळे त्या वास्तू सध्या कचरा साठवणूक असलेली केंद्र बनली असून, पालिकेचे स्वच्छतेचे मिशन अशा बंद पडलेल्या सरकारी वास्तू यांच्यामुळे रोग प्रसारक केंद्र बनल्या आहेत, असा आरोप शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि लेखक दिलीप गडकरी यांनी केला आहे. स्वच्छतेचा पुरस्कार करणाऱ्या शहरात कचऱ्याचे असे ढीग तयार झाले आहेत, असेही गडकरी म्हणाले.**



कर्जतमधील जुने प्राथमिक आरोग्य केंद्र या आवारात भव्य उपजिल्हा रुग्णालय उभे राहिले आहे. त्या आवारात असलेले पूर्वीचे प्राथमिक आरोग्य केंद्र आणि कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी आणि डॉक्टरांच्या क्वॉर्टर्स असलेली जुनी इमारतदेखील मोडकळीस आली आहे, त्यामुळे या इमारती शासनाने धोकादायक जाहीर केल्या आहेत आणि त्यामुळे सर्व इमारती या रिकाम्या करण्यात आल्या आहेत. त्या ठिकाणी स्वच्छता राखणे यांची कोणतीही जबाबदारी आरोग्य विभाग, कर्जत नगरपरिषद आणि शासन यांच्याकडून पार पाडली जात नाहीत, असा आरोप करण्यात येत आहे. काही नागरिक या परिसराचा सार्वजनिक मुतारीसारखा वापर करत आहेत. याच परिसरात काही शासकीय क्वॉर्टर्स अनेक वर्षांपासून मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत, त्यामुळे अशा वास्तूंची स्वच्छता राखण्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न दिलीप गडकरी यांनी उपस्थित केला आहे.

शहरातील बाजारपेठ भागात असलेल्या पोलीस वसाहतीमध्येदेखील कचरा अस्वच्छता यांचा प्रश्न गंभीर आहे.

नगरपालिकेने संबंधित खात्याकडे पाठपुरावा करून अशा इमारती पाडून तेथे स्वच्छता राखण्यासाठी प्रयत्नं करावा, अशी सूचना देणारे पत्र दिलीप गडकरी यांनी कर्जत नगरपरिषदेकडे दिले आहे. कर्जत नगरपरिषदेने कर्जत शहराचे सुशोभिकरण आणि स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे.

कर्मचारी आणि नागरिक यांचे चांगले सहकार्य स्वच्छता मोहीम राबवित असताना मिळत असते. कर्जत शहरातील मोडकळीस आलेल्या वास्तूबरोबर धापया मंदिर ते बाजारपेठ या परिसरात नदीतील मच्छी विकायला आदिवासी लोक बसतात. त्यांच्या पाठीमागे जुन्या रेशनिंग दुकानाची इमारत मोडकळीस आली आहे. तेथे देखील कचऱ्याचा ढीग असतो. नगरपालिकेने अशी ठिकाणे शोधून संबंधित मालकांना स्वच्छता राखण्यासंदर्भात लक्ष देण्याची सूचना करावी, अशी विनंती गडकरी यांनी पालिकेला केली आहे. शहरातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मंडळी याकडे लक्ष देतील काय, असा प्रश्न केला आहे.

# रायगडात लिंबूचे भाव वधारले

## १० रूपयांना एक लिंबू



**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

हिवाळा नुकताच सरला असून उन्हाची काहिली आता वाढू लागली आहे. त्यामुळे शरीराला थंडावा देण्यासाठी व ऊर्जा टिकविण्यासाठी लिंबू पाणी व सरबत सर्वात उत्तम पर्याय आहे. मात्र मागील महिन्याच्या तुलनेत सध्या लिंबाचे भाव वधारले आहेत. किरकोळ बाजारात मागील महिन्यात दहा रुपयांना दोन मिळणारे लिंबू आता चक्क दहा रुपयांना एक मिळत आहे.

डॉक्टर देखील उन्हाळ्यात लिंबू सरबत पिण्याचा सल्ला देतात.

> घाऊक बाजारात लिंबाच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे आपोआप किरकोळ बाजारात किंमत वाढली आहे. तसेच सध्या आवक देखील कमी आहे.
>
> –राजेश फोंडे, भाजी विक्रेता, पाली

लिंबाला मागणी वाढत आहे. तसेच उसाचा रस काढताना देखील लिंबू लागतो. मात्र आवक कमी आणि किंमत जास्त यामुळे लिंबाने सर्वांना घाम फोडला आहे. लिंबाचे भाव वाढल्याने लिंबू सरबताचे भाव देखील आपोआप वाढले आहेत. हॉटेलच्या प्लेटमधून देखील आता लिंबू गायब होऊ लागला आहे. मोठे लिंबू तर सध्या बाजारात पहायला देखील मिळत नाहीत. किंमती वाढल्या असल्या तरी आरोग्यवर्धक लिंब खरेदी केली जाते.

# नरेंद्र महाडिक समाज भूषण पुरस्कार

**। महाड । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. यावेळी महाडच्या नरेंद्र महाडिक यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आ. किशोर झोडगेवार, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमन भांगे, समाज कल्याण विभागाचे आयुक्त ओमप्रकाश बकेरिया आदी मान्यवर उपस्थित होते. महाडीक हे महाडच्या सामाजिक क्षेत्रात गेली तीन दशके सातत्याने कार्यरत असून विविध संस्थाच्या माध्यमातून त्यांचा कृतीशिल प्रवास सुरू आहे. संत रोहिदास विकास मंडळ, हिरवळ प्रतिष्ठान, कोकण मराठी साहित्य परिषद, रंगसुगंध, ऋतुरंग, पर्ण फाऊंडेशन सारख्या संस्थांच्या विविध उपक्रमात त्यांचे मोलाचे योगदान आहे.




# प्रशासनाचे मतदारांना मतदानासाठी आवाहन




**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

लोकसभेसाठी निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या असून, आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सुधागड तालुक्यातील भेरव गावात आयोजित सभेत मतदारांनी लोकसभेसाठी जास्तीत जास्त टक्के मतदानाचा अधिकार बजावावा यासाठी सुधागड तालुका तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

मागील लोकसभा निवडणुकीला भेरव येथील मतदार केंद्रावर केवळ १६ टक्के इतकेच मतदान झाले होते. त्यामुळे यावेळी हा टक्का वाढावा यासाठी तहसीलदारांकडून मतदारांना आवाहन करण्यात आले. आपले मत अमूल्य आहे. संविधानाने आपल्याला आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिलेला आहे. आपल्या मताची शासन स्तरावर नोंद झाली पाहिजे. आपले मत वाया जाऊ नये तसेच ठाणे, मुंबई, पुणे सारख्या बाहेरगावी राहणाऱ्या मतदारांना देखील मतदानासाठी येण्याचे व बहुसंखेने उपस्थित राहून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे यांनी केले आहे.

यावेळी मंडळ अधिकारी अंकुश साळवे, उद्धव गुंजाळ, अमिषा सागळे, अतिश सागळे, सतीश मांढरे, मंगेश मांढरे, सोनाली मांढरे, दीपक पुशीलकर, रामचंद्र मोरे, प्रभाकर टक्के रश्मी लखीमळे तसेच महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.



# विलास मते यांचा सत्कार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कशेळे गावासारख्या गावात कुटुंबाची आर्थिक स्थिती हालाखीची असताना कशेळे गावातील विलास मते यांनी कठोर परिश्रम घेऊन पोलीस शिपाई ते पोलीस उपअधीक्षक पदापर्यंत भरारी घेतली आहे. त्यांच्या या उत्तुंग भरारीबद्दल कशेळे ग्रामस्थांच्या वतीने पोलीस उपअधीक्षक विलास मते यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

पोलीस शिपाई ते पोलीस उपअधीक्षकपदापर्यंत घेतलेली भरारी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मुलांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. पोलीस खात्यातील इतक्या मोठ्या पदापर्यंत पोहचणारा कर्जत तालुक्यातील पहिलाच अधिकारी असल्याने त्यांचा सत्कार कशेळे ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी कशेळे गावातील जेष्ठ नागरिक, सर्व राजकीय पक्षांचे प्रमुख कार्यकर्ते आणि ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

# आगरी समाजातील प्रतिभावंतांचा सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



नेरळमध्ये विविध स्पर्धा परीक्षामध्ये यशस्वी झालेल्या तरुणांचा सन्मान 'आम्ही आगरी' युवा ग्रुपकडून करण्यात आला. नुकत्याच जाहीर झालेल्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झालेला तरुण तसेच आर्मीमध्ये निवड झालेले दोन तरुण आणि मेडिकल शिक्षण पूर्ण करणारी तरुणी अशा चार तरुणांचा त्यांच्या घरी जावून सन्मान करण्यात आला.

नुकत्याच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत तालुक्यातील आंबोट गावातील तरुण निलेश मसणे यांनी लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षेचा अडथळा दूर करीत पोलीस निरीक्षक पदावर निवड झाली. नेवाळी गावातील तरुण दर्शन बागडे यांची निवड आर्मीमध्ये झाली. तर तालुक्यातील कोदीवले गावातील बाळाजी राणे या तरुणाची देखील आर्मीमध्ये निवड झाली. उत्तम कोळंबे यांची कन्या श्रुती हिने बीएएमएसपर्यंत शिक्षण पूर्ण केले म्हणून त्यांच्या घरी जावून सन्मान करण्यात आला.

'आम्ही आगरी' ग्रुपचे केशव मुने, मनीषा दळवी, संतोष पेरणे, मनोहर हजारे, सज्जन गवळी, कैलाश थेर, सुभाष नाईक, हरेश सोनावळे, हेमंत कोंडीलकर, योगेश कांबरी, यांच्यासह मिलिंद विरले, अंकुश शेळके, संदीप म्हसकर, विलास डुकरे, किशोर घारे, भगवान जामघरे, संदीप मसणे, संतोष धुळे, अंकुश दुर्गे, आदी सदस्य उपस्थित होते.

# गोविंद घरत यांना पुरस्कार

**। उरण । वार्ताहर ।**

आनंदनगर होळी उत्सवाच्या निमित्ताने दिला जाणारा आनंदनगर भूषण पुरस्कार गोविंद घरत यांना देण्यात आला. यांनी आजपर्यंत ५४ वर्ष भजन कीर्तन दिंडी पदयात्रा केली आहे.

गोविंद घरत यांच्या वारकरी संप्रदायाच्या सेवेची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला यामुळे पुरस्काराचा मान वाढल्याचे पत्रकार शेखर पाटील यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी लता पाटील, दीपिका ठाकूर, पुष्पा म्हात्र, उपस्थित होते.

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौज तिवरे, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक सुप्रिया विलास थोरवे. रा-पोसरी, ता-कर्जत, जि रायगड पिन ४१०२०१ यांची खलील वर्णन केलेली जमीन मिळकत

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| तिवरे | ५७ | १ अ | ०.०८.१० | १.५५ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक सुप्रिया विलास थोरवे यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ०७ दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह हरकत दाखल करावी, वरील देण्यात आलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस सदरील मिळकतीचे मालक व आमचे आशिल हे जबाबदार राहणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

दिनाक २६/०३/२०२४

**ॲड भारत अंकुश सांवत**
(बी कॉम. एल.एल.बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि-रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे पोसरी,ता- कर्जत, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक विलास वासुदेव थोरवे. रा-पोसरी, ता-कर्जत, जि रायगड पिन ४१०२०१ यांची खलील वर्णन केलेली जमीन मिळकत

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| पोसरी | ३ | १७ | ०.११.४० | १.६० |

व

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| पोसरी | ७ | ९ | ०.०५.८० | ०.४० |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक विलास वासुदेव थोरवे यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिदध झाले पासुन ०७ दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह हरकत दाखल करावी, वरील देण्यात आलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस सदरील मिळकतीचे मालक व आमचे आशिल हे जबाबदार राहणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

दिनांक २६/०३/२०२४

**ॲड भारत अंकुश सांवत**
(बी कॉम. एल. एल. बी )
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि-रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

# जे.बी.सावंत विद्यालयात मिनी सायन्स लॅबचे उद्‌घाटन

**। माणगाव । वार्ताहर ।**

जर्मन उद्योगपती डॉ. गुंर्थर रुडॉल्प वॉबसर यांच्या सहाय्याने जे.बी.सावंत हायस्कूल लोणेरे विद्यालयात मिनी सायन्स लॅबचे शुक्रवारी (दि.२२) मिनी सायन्स लॅबचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सी.एस.आर इनिशिएटिव्ह ऑफ डोनर डॉ. गुंर्थर रुडॉल्प वॉबसर जर्मनी .को. स्पॉन्सर्ड रोटरी क्लब ऑफ मुंबई गोरेगाव वेस्ट व सावंत प्रोसेस सेल्यूशेन तसेच रोटरी क्लब ऑफ मुंबई गोरेगाव वेस्टचे माजी अध्यक्ष संदिप सावंत यांच्या सौजन्याने ही मिनी सायन्स लॅब उभारण्यात आली आहे. ग्रामीण भागातील तळागाळातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाबद्दल आवड निर्माण व्हावी.



जिज्ञासावृती निर्माण व्हावी या उद्देशाने मिनी सायन्स लॅब उपलब्ध करून दिली आहे.

कार्यक्रमास नाना सावंत, सुभाष शिंदे, सुरेखा तांबट, भावेश शहा, गौरी भडकमकर, सखाराम गिरापे, संदिप सावंत ,भाऊ सावंत, नंदू पेंढारी, पन्हळघर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ लोणेरे व जे.बी सावंत शिक्षण मंडळ मुंबई या संस्थेतील सर्व मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक,पालक, विध्यार्थी उपस्थित होते.

# कोंकण ज्ञानपीठात पदवीदान समारंभ

**। कर्जत । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ संपन्न झाला. डॉ. रजनी शेट्टीगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना पदवीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणिता भांगरे यांनी केले. याप्रसंगी प्रदीपचंद्र शृंगारपुरे, विजय मांडे, डॉ. मोहन काळे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोंधळी, प्राचार्या डॉ. स्मिता टाकरखडे, डॉ. अमोल चांदेकर, डॉ. अतुल रेंगे, प्रा. भगवान डावरे, प्रतीक्षा वासनकर, डॉ.एस.बी.पाटील, डॉ. निलोफर खान, डॉ. सतीश पांडव, प्रा. स्वप्नील फालक, प्रा. मनिषा चौधरी, प्रा. अश्विनी भोईर, आदी उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

मा. सोनावणे साहेब कोर्ट
ॲड. श्री. संतोष गंगाराम आखाडे
रा. इंदिरा गांधी नगर, माथेरान
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०२
मो. नं. ९४२३८२२०४०
नि. नं.
क्रि.चौ.अर्ज.नं. १६४९/२०२३
ने.ता.२३/४/२०२४

**पनवेल येथील मे दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

१) श्रीम. सिंधु मधुकर खांगटे, वय ६२ वर्षे,
धंदा-गृहीणी,
२) श्रीम. अरूणा काशिनाथ खांगटे, वय ५२ वर्षे, अर्जदार
धंदा-गृहीणी,
क्र. १ व २ रा. माथेरान, कोतवालनगर, ता. कर्जत, जि. रायगड,

विरूध्द

श्री. मनोहर सिताराम खांगटे, वय वर्षे,
धंदा - खाटीक, सामनेवाले
रा. माथेरान, कोतवालनगर, ता. कर्जत, जि. रायगड

तमाम लोकांस या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यांत येते की, अर्जदाराचे सासरे कै. सिताराम मधु उर्फ मथाजी खांगटे हे दिनांक १८/०२/२००८ रोजी अल्पशा आजाराने मयत झालेले आहेत. ते हयात असताना दुय्यम निबंधक कार्यालयात दि. २१/०६/२००४ रोजी मृत्यूपत्र दस्त क्र. १६१५/२००४ अन्वये नोंदवून ठेवल्याप्रमाणे प्रोबेट व लेटर ऑफ ॲडमिनीस्ट्रेशनचा आदेशासाठी अर्जदारा यांनी अर्ज मे. पनवेल येथील जिल्हा न्यायाधिश साहेब यांच्या न्यायालयात यांचे कडे अर्ज केलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास आपण पुराव्यासह ३० दिवसाच्या आत या न्यायालयात कळवाव्यात जर कोणतीही हरकत आली नाही तर वरील अर्जदारांच्या लाभात मे. न्यायालय वारस दाखला देतील. याची नोंद घेण्यांत यावी.

आज दिनांक १९/३/२०२४ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली

सही/
**श्री/श्रीम.**
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय पनवेल**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय पनवेल**

# माथेरानचे विद्यार्थी रमले मैदानात

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये इंग्रजी माध्यमाच्या सेंट झेवियर शाळेच्या परीक्षा संपल्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी येथे नव्यानेच आलेल्या प्रा. सिस्टर सेसिलिया यांच्या संकल्पनेतून येथे प्रथमच समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण विकास व खेळ भावना रुजू व्हावे हा यामागचा उद्देश असल्याचे शाळेतून सांगण्यात आले.

माथेरानमध्ये असलेले इंग्रजी माध्यमाची एकमेव शाळा म्हणून लौकिक असलेले सेंट झेवियर शाळेचा परीक्षा हंगाम नुकताच संपला असून लवकरच नवीन वार्षिक वर्ष सुरू होणार आहे; परंतु या मधल्या काळामध्ये येथील विद्यार्थ्यांच्या मनामध्ये खेळ भावना रुजावी व त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास व्हावा याकरिता शाळेकडून प्रथमच समर कॅम्पचे आयोजन केले आहे. येथील प्रसिद्ध वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडांगणामध्ये रोज शालेय विद्यार्थ्यांच्या विविध ६०० खेळ व बौद्धिक चाचण्या घेतल्या जातात. खेळांमध्ये प्रामुख्याने माथेरानमध्ये प्रथमच रग्बी, ज्युडो, कराटे, योगासने व बौद्धिक प्रगती होईल, अशा कार्यशाळा घेतल्या जात आहेत. येथील विद्यार्थ्यांकडून या उपक्रमास प्रचंड प्रतिसाद मिळत असून, पालकवर्गाकडूनही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.




> माथेरान हे निसर्गाच्या सानिध्यात असलेले एक सुंदर पर्यटन स्थळ आहे. डोंगरावर असल्याकारणाने येथील विद्यार्थ्यांना मर्यादित सुविधा उपलब्ध आहेत, त्यामुळेच त्यांचा बौद्धिक व शैक्षणिक विकास व्हावा याकरिता या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. – प्रा. सिस्टर सिसिलिया

> आम्हा विद्यार्थ्यांसाठी हे नवीनच होते; परंतु त्यामध्ये शिकविण्यात येणारे अनेक खेळांचे प्रकार व बुद्धिमत्ता वाढवण्यासाठी घेण्यात येत असलेले विविध क्लासेस यामुळे आम्हा विद्यार्थ्यांना नवनवीन प्रकार शिकावयास मिळत आहेत.
>
> – मानव कदम, विद्यार्थी

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**निवडक**

## आमिर विश्‍वचषक खेळणार?

**कराची :** स्पॉट फिक्सिंगमध्ये दोषी राहिलेला पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिर यानं तीन वर्षानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपली निवृत्ती मागे घेतली आहे. त्याने क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याची घोषणा केली. यावर्षी होणारा टी-२० विश्‍वचषक खेळण्यासाठी आमिरने हा निर्णय घेतला.आमिर डिसेंबर २०20 मध्ये निवृत्त झाला होता. आता त्याने पुनरागमन केले आहे. त्याची टी-२० विश्‍वचषकासाठी निवड होणार की नाही हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

## शाहीनचे कर्णधारपद धोक्यात

**लाहोर :** शाहीन आफ्रिदीची पाकिस्तानाचा कर्णधार म्हणून नोव्हेंबरमध्ये निवड करण्यात आली होती. मात्र त्याच्या नेतृत्वाखाली खेळलेल्या मालिकेत न्यूझीलंडने पाकिस्तानचा ४-१ असा पराभव केला होता. पीसीबीचे नवे चेअरमन मोहसीन नक्वी यांनी शाहीन आफ्रिदीच पाकिस्तान टी २० संघाचा कर्णधार असेल का हे सांगण्यास नकार दिला. मोहसीन नक्वी यांनी निवड समितीच्या लाँचवेळी नवीन निवडसमिती पाकिस्तानचा कर्णधार निवडेल असे सांगितले.

## मोदी स्टेडियममध्ये राडा

**अहमदाबाद :** हार्दिक पांड्याच्या पुनरागमनावर मुंबईचे चाहते खूष नाहीत. रविवारी, हा वाद स्टेडियमवर उफाळून आला. मुंबई आणि गुजरातच्या सामन्यादरम्यान दोन खेळाडूंच्या चाहत्यांमध्ये शाब्दिक वाद झाला आणि ज्याचे रुपांतर हाणामारीत झाले. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. तुम्ही कोणत्याही खेळाडूचे समर्थक असले तरी ही घटना एकूणच भारतीय क्रिकेटच्या दृष्टीनं चांगली नाही. आता यावर अहमदाबाद पोलीस काय कारवाई करतात, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## किदाम्बी श्रीकांतचा पराभव

**नवी दिल्ली :** श्रीकांतला तैवानच्या लिन चुन-यीकडून तीन सेटमध्ये पराभव पत्करावा लागला.स्विस ओपन २०२४ बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत किदाम्बी श्रीकांतचा पराभव झाला.यासह भारताचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आलंय.जागतिक क्रमवारीतील माजी अव्वल खेळाडू श्रीकांतला तैवानच्या लिन चुन-यीकडून एक तास पाच मिनिटे चाललेल्या सामन्यात २१-१५, ९-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला.


## क्रिकेटपटू रंगले रंगात

**मुंबई :** सध्या आयपीएलच्या सतराव्या हंगामाचा थरार रंगला आहे. देशात सर्वत्र होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अनेक सेलिब्रिटीही होळीच्या रंगात न्हाऊन निघतात. क्रिकेटपटू देखील होळीच्या रंगात न्हाऊन निघाले असून त्याची झलक समोर आली आहे. मुंबई इंडियन्सच्या फ्रँचायझीने माजी कर्णधार रोहित शर्मा होळी खेळत असल्याचा व्हिडीओ शेअर केला आहे. तर केकेआरचा कर्णधार श्रेयस अय्यर, मार्गदर्शक गौतम गंभीर हे देखील होळी खेळताना दिसले.

# गुजरातने केला मुंबईचा पराभव

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ चा गुजरात टायटन्स विरूद्ध मुंबई इंडियन्स या तुल्यबळ संघांचा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगला. मात्र गुजरातने आपला आपला बदला घेत हार्दिकच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सचा ६ धावांनी पराभव केला. गुजरातने मुंबईसमोर विजयासाठी १६९ धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र मुंबईला २० षटकात ९ बाद १६२ धावांपर्यंतच मजल मारता आली. रोहित शर्माने ४३ तर डेवाल्ड ब्रेविसने ४६ धावा करत सामन्यावर पकड निर्माण करून दिली होती. मात्र मुंबईच्या मधल्या फळीतील फलंदाजांनी कच खाल्ली.



नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेत अन् गुजरातचं कौतुक करत पांड्या तंबूमध्ये परतला. हार्दिक पांड्याचा घोर अपमान झाला असं वाटेल. मात्र दोन हंगामात टांग देत मुंबईत कोलांटी उडी मारणाऱ्या हार्दिकला क्रिकेटमध्ये व्यक्ती नाही तर संघ मोठा असतो हे गुजरात टायटन्सला दाखवून द्यायचे होते. त्यांनी ते पहिल्याच सामन्यात दाखवून देण्याचा प्रयत्न केला. १६९ धावांचा पाठलाग करणाऱ्या मुंबईला चांगलाच घाम फोडला. मोहित शर्माने टाकलेले ते १८ वे षटक टर्निंग पॉईंट ठरले.गुजरातचे १६९ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या मुंबईने खराब सुरूवातीनंतर डाव सावरला होता. रोहित शर्माने ४३ अन् डेवाल्ड ब्रेविसनं ४६ धावा करत मुंबईची सामन्यावर पकड निर्माण करून दिली होती.

मात्र किशोरने रोहितची अन् मोहितने ब्रेविसची शिकार केली अन् मुंबईची पकड सुटली. मोहितच्या प्रभावी माऱ्यासमोर टिम डेव्हिड अन् तिलक वर्माची डाळ शिजली नाही. ३ षटकात ३६ धावांची गरज होती त्यावेळी मोहितनं १८ व्या षटकात फक्त ९ धावा देत टीम डेव्हिडचा महत्वाचा बळी घेतला. त्यानंतर तिलक अन् पांड्याने काही फटके मारून सामना पुन्हा खेचण्याचा प्रयत्न केला. मात्र आधी स्पेन्सरने तिलक वर्मा नंतर उमेश यादवने हार्दिक पांड्याला बाद करत मुंबईचा हा प्रयत्नही हाणून पाडला.

गुजरातच्या फलंदाजीबाबत बोलायचे झाले तर नाणेफेक हार्दिकनं जिंकली होती. त्याने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या तीन षटकात ३० धावा करत शुभमन गिलने हार्दिकच्या कपाळावर चिंतेच्या रेषा उमटवल्या होत्या. मात्र जसप्रीत बुमराहने साहाचा त्रिफळा उडवला अन् गुजरातच्या फलंदाजीला पहिले खिंडार पाडले. धावगती थोडी मंदावली मात्र परिस्थिती तशी नियंत्रणातच होती.

साई सुदर्शननं एक बाजू लावून धरली होती अखेर बुमराहने त्याची झुंजार खेळी ४५ धावांवर संपवली. पाठोपाठ धोकादायक डेव्हिड मिलरलाही जास्त संधी न देता तंबूमध्ये धाडले. बुमराहने अशा तीन तगड्या शिकारी करत आपले पुनरागमन दणक्यात साजरे केले.गुजरातची अवस्था ५ बाद १३४ धावा अशी झाली असताना राहुल तेवतियाने आपली मॅच फिनिशरची चुणूक दाखवून दिली. त्यानं १८ व्या ओव्हरमध्ये १९ धावा चोपल्या. मात्र बुमराहने पुन्हा शेवटच्या षटकात त्याला बाद केले.

# ॲड. आस्वाद पाटील यांना शुभेच्छा





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांचा पेझारी येथील निवासस्थानी वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी मंत्री मीनाक्षी पाटील, माजी आ.पंडित पाटील, रायगड बाजार चेअरमन नृपाल पाटील, अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, माजी जि.प.सदस्या भावना पाटील, चित्रा पाटील, शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, युवा नेते सवाई पाटील, सुमना पाटील, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, प्रमोद ठाकूर, संजय मोकल, रमेश म्हात्रे तसेच हिरामण भोईर, ॲड.अजिंक्य पाटील, शुभम मोकल, विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी ॲड. आस्वाद पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



# ज्युनियर मुलांची क्रिकेट निवड चाचणी पेणला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगडा जिल्ह्याचा १९ वर्षांखालील मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे पेण येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. नगरपालिकेच्या मैदानावर २६ ते २८ मार्च या कालावधीत ही निवड चाचणी होणार आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आमंत्रितांच्या स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा १९ वर्षांखालील मुलांचा संघ या चाचणीतून निवडण्यात येणार आहे, अशी. माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

१ सप्टेंबर २००५ नंतर जन्मलेले शकतील. रायगड जिल्ह्यातील रहिवाशी खेळाडूंनाच यात भाग घेता येईल.

क्रिकेटचा पांढरा गणवेश आणि स्वतःचे साहित्य यासह खेळाडूंनी २६ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता पेण नगरपालिकेच्या मैदानावर हजर राहायच आहे. निवड चाचणीसाठी येताना आधार कार्ड आणि वयाचा दाखला खेळाडूंनी सोबत आणणे आवश्यक आहे.

निवड चाचणी शुल्क २०० रुपये असणार आहे. अधिक माहितीसाठी चंद्रकांत मते ०९८२२८३६४४२, प्रशांत ओक ९८२२४२२६७६, राजेश पाटील ७७७७०६४१११ यांच्याशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्र 'श्री' शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये उदय देवरे यांची सुवर्ण कामगिरी


**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने 'महाराष्ट्र श्री' ही अजिंक्यपद राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा अंधेरी शहाजीराजे क्रीडा संकुल येथे डॉ. संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

राज्यातून ३०० खेळाडू या स्पर्धेमधे सहभागी झाले. या स्पर्धेत ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८०, ८५,९० व ९५ किलो वरील वजनी गटातील विविध जिल्ह्यातील शरीरसौष्ठवपटूंना खेळण्याची संधी मिळाली. स्पर्धेमध्ये रायगडचे प्रतिनिधित्व रोहा चिकणी या गावामधील ७५ किलो वजनी गटात उदय देवरे याने केले.

या स्पर्धेमधे उदय देवरे यांनी ७५ किलो गटात सुवर्ण पदकाला गवसणी घातली महाराष्ट्र 'श्री' किताब विजेतेपदासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीमध्ये स्पर्धेचे द्वितीय उपविजेतेपद मिळवले.

उदय देवरे हे एका खाजगी कंपनीमध्ये काम करतात. शरीरसौष्ठव या क्षेत्रामध्ये त्यांना कुटुंब, मित्र परिवार आणि कंपनीकडून मिळणारे पाठबळ व रायगड जिल्हा जनरल सेक्रेटरी दिनेश शेळके यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन त्यांच्या यशामागचे कारण आहे पुढील महिन्यामध्ये होणाऱ्या भारत श्री स्पर्धेमधे रायगड जिल्ह्याचे व महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



# साखर खाडीत हात होडी स्पर्धा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील पांडबादेवी मित्र मंडळ रायवाडीच्या वतीने आक्षी- साखर खाडीत हात होडींच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

रायवाडी व साखर येथील १२ हात होडी या शर्यतीत सहभागी झाल्या होत्या. हात होडी चालवण्याची कसब तरुण पिढीत टिकून रहावे आणि पर्यटक हाताने व्हल्हे मारणाऱ्या होडींकडे आकर्षित व्हावे या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



लहान होड्या आणि मोठ्या होड्या अशा दोन गटांमध्ये या स्पर्धा पार पडल्या. आक्षी पुलाखालून सुटल्यावर ३ किलो मीटर अंतरावर फेरी मारून परतीचा मार्ग अशी व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी होडी चालकांची कसब, त्यांच्यामधील संयमी व एकाग्रता दिसून आली. छोट्या गटात प्रथम क्रमांक मित जग्गू -भाग्येश जग्गु, दुसरा क्रमांक यज्ञेश पाटील-गणेश वादळे यांनी पटकावला. तर मोठ्या गटात अनिकेत बानकर-दुर्गेश बानकर यांनी प्रथम क्रमांक, तसेच दुसरा क्रमांक प्रथम लाल-ओंमकार वादळे तर तृतीय क्रमांक बॉक्स फायटर-विपूल बानकर यांनी पटकावला.

# पर्यावरणासाठी सायकलपटूची जनजागृती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

११ वर्षीय शाळकरी विद्यार्थी आपल्या पॅशनसाठी प्रसिद्ध असलेल्या हिरेन राम हिसालके या सायकलपटूने जागतिक हवामान बदल दिनानिमित्त जनजागृती दिनानिमित्त सायकल वरून फेरी मारून केली.नेरळ मधील बाजारपेठ,गृह निर्माण संस्था आणि सगुणाबाग येथे स्थानिकांनी हिरेनच्या उपक्रमाचे कौतुक केले.




१५ ऑगस्ट २०२३ आणि २ जानेवारी २०२४ मध्ये कुठेही न थांबता ३५ ते ४५ किलोमीटर अंतर सायकल चालवून हुतात्मा आणि क्रांतिकारक यांना अभिवादन केले.नेरळ गावातील विद्या विकास मंदिर शाळेत शिकत असलेल्या हिरेन याने जागतिक हवामान बदल दिनाचे निमित्ताने रविवारी सायकलवरून जनजागृती मोहीम यशस्वी केली.त्यासाठी सायकलवर प्रदूषण रोखण्याचे आवाहन करणारे फलक तसेच झाडे लावा झाडे जगवा यासह झाडांची तोड होत असल्याने आणि सतत वणवे लावले जात असल्याने पर्यावरणासाठी निर्माण झालेला धोका याची माहिती देणारे साहित्य हिरेन हिसालके याने आपल्या सायकलवर बांधून सर्वांचे लक्ष वेधले. त्यात सर्वात महत्वाचे जनजागृतीचे कार्य हिरेनने आपल्या पाठीवर ऑक्सिजन सिलिंडर ठेवला होता आणि त्या सिलिंडरमधून नाकावाटे प्राणवायू घेण्याचा प्रयत्न भविष्यात करावा लागले अशी संकल्पना घेऊन सकाळपासून नेरळ गावात जनजागृती केली.

सायकलवरून निघालेल्या हिरेनचे सर्वत्र कौतुक होत होते. विद्यार्थी तसेच ग्रामस्थ यांच्यासमोर सायकल थांबवून हिरेन सर्व माहिती देत होता. नेरळमधील अनेक गृहनिर्माण संस्था यांनी हिरेनला संपर्क साधून आपल्या सोसायटीमध्ये येऊन जनजागृती करण्याचे निरोप दिले होते. नेरळ बाजारपेठमध्ये देखील हिरेनच्या उपक्रमाचे कौतुक केले.

त्यानंतर रविवार असल्याने सगुणाबाग येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक आले होते. हिरेनला तेथे बोलावून घेतले. सगुणाबाग येथे पर्यटकांनी हिरेन सोबत फोटो काढून त्यांच्या संकल्पनेबद्दल जाणून घेतले. या उपक्रमाची सुरुवात नेरळ पोलीस ठाणे येथे पोलीस उपनिरीक्षक सरगर यांनी झेंडा दाखवल्यावर हिरेन चा सायकल प्रवास सुरु झाला आणि जनजागृती सुरु झाली.

### ७० वी वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# हरियाणाने राष्ट्रीय जेतेपद आणले खेचून;रेल्वेचा कडवा प्रतिकार काढला मोडून

**। अहमदनगर । वृत्तसंस्था ।**

हरियाणाने '७०व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी' स्पर्धेत भारतीय रेल्वेचा कडवा प्रतिकार ३५-३० असा मोडून काढत विजेतेपद मिळविले. दरभंगा-बिहार येथे झालेल्या ५१व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत हरियाणाने बँक स्पोर्टस् बोर्डला नमवित पहिल्यांदा विजेतेपद मिळविले होते. नंतर त्यांना मुंबई-महाराष्ट्रात(२०१२) रेल्वे कडून, पटणा- बिहार येथे(२०१४) राजस्थानकडून, तर जोधपूर-राजस्थान येथे(२०१६-१७) सेनादलकडून पराभव पत्करावा लागल्याने उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले होते. तर २०२२ साली यजमान पद लाभलेल्या '६९व्या राष्ट्रीय स्पर्धेत' हरियाणाला उपांत्य फेरीत महाराष्ट्राकडून पराभव पत्करावा लागला होता. भारतीय रेल्वे या अगोदर सलगचार वेळा विजेते होते.

अहमदनगर, वाडिया पार्क क्रीडा संकुलातील मॅटवर झालेला अंतिम सामना पाहण्याकरीता नगरकरांनी तुफान गर्दी केली होती. पंकज मोहितेने आपल्या पहिल्याच चढाईत गुण घेत रेल्वेचे खाते उघडले. पण १०व्या मिनिटाला ९-६ अशी आघाडी हरियाणाकडे होती. १२व्या मिनिटाला ९-९, तर १५व्या मिनिटाला ११-





११ अशी पुन्हा बरोबरी झाली. १८व्या मिनिटाला पंकजने हरियाणाचे शिलकी दोन गडी टिपत हरियाणावर पहिला लोण देत रेल्वेला १७-१३ असे आघाडीवर नेले. सामना विश्रांतीला थांबला तेव्हा १८-१५अशी रेल्वेकडे आघाडी होती. शेवटची ५ मिनिटे पुकारली तेव्हा रेल्वेकडे २७-२४ अशी आघाडी होती. शेवटची १-२ मिनिटे असताना हरियाणाच्या आशू मलिकने शिलकी २ गडी टिपत रेल्वेवर लोण देत ३१-३० अशी आघाडी घेतली. शेवटी ५ गुणांनी ७०व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचा चांदीचा चषक उंचाविला.

हरियाणाच्या या विजयात आशू मलिकने १ बोनस व १२ गुण असे १३ गुण घेत महत्वाची भूमिका बजावली. मोहित गोयतने २ गुण, २ पकडीचे आणि एक अव्वल पकड करीत २ गुण असे ६ गुण घेत त्याला योग्य साथ दिली. क्रिशनने ४, तर जयदीपने २ पकडी करीत बचावाची बाजू उत्तम सांभाळली. भारतीय रेल्वेकडून पंकज मोहीतेने १ बोनस व ६ गुण असे ७ गुण मिळविले. एम. सुधाकरने ५ गुण घेत त्याला छान साथ दिली. सूरेंदर गिल, नितेश कुमार, परवेज भैस्वाल यांनी प्रत्येकी ३-३ पकडीत गुण घेतले. तरी देखील रेल्वेला पाचव्यांदा जेतेपद राखण्यात अपयश आले. चंदीगडला पहिल्यांदाच उपांत्य फेरीत घेऊन जाणाऱ्या पवन शेरावतची उणीव रेल्वेला भासली असेल. स्पर्धेचे बक्षीस वितरण हॉकीचे आंतर राष्ट्रीय खेळाडू धनराज पिल्ले, शशिकांत गाडे यांच्या उपस्थितीत पार पडले. हरियाणाने अंतिम विजेतेपद मिळविल्याने महाराष्ट्राच्या खेळाडूंना व क्रीडा रसिकांना कुठे ना कुठे तरी चुटपुट लागून राहिली असेल. या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात हरियाणाने महाराष्ट्राला ३८-३७ असे, तर भारतीय रेल्वेने चंदीगडला ५-५ चढायांच्या डावात ४३-४१ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. बाद फेरीपासूनचे सर्वच सामने चुरशीने खेळले गेले. त्यामुळे सामने पहाण्यासाठी गर्दी दिसली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)